शुक्रवार, ४ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १०७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग
मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम आणि ग्रामसभा/२
लोको पायलटच्या सतर्कतेमुळे मिनीट्रेनचा अपघात टळला/५
पाकिस्तानची द. आफ्रिकेवर मात; आव्हान कायम/८

## पाकिस्तानमध्ये गोळीबारात इम्रान खान जखमी



**इस्लामाबाद :** पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या रॅलीवर गुरुवारी (दि. ३) गोळीबार झाला. या गोळीबारात इम्रान खान जखमी झाले आहेत. त्यांच्या पायाला जखम झाल्याचे सांगितले जात आहे. इम्रान खान यांच्या पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाने तातडीने निवडणूक घेण्याची मागणी करीत लाहोर ते इस्लामाबाद 'हकीकी आझादी मार्च' नावाने महामोर्चा काढला असून हा मोर्चा ४ नोव्हेंबरला इस्लामाबादला पोहचणार होता. पक्षाचे हजारो कार्यकर्ते खान यांच्यासह राजधानीकडे निघाले होते. हा मोर्चा वजिराबाद शहरात पोहचला असता जफरअली खान चौकात गोळीबाराची घटना घडली. यात इम्रान खान यांच्यासह अन्य काही जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, पोलिसांनी गोळीबार करणाऱ्याला अटक केल्याचे वृत्त आहे.

# महाराष्ट्रासाठी दोन लाख कोटींचे २२५ प्रकल्प मंजूर

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रासाठी दोन लाख कोटींचे २२५ प्रकल्प मंजूर करण्यात आले असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. ३) दिली. राज्य सरकारतर्फे मुंबईत आयोजित रोजगार मेळाव्यात नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. त्या वेळी पंतप्रधान मोदींनी ऑनलाइन संवाद साधत महाराष्ट्रात भविष्यात तरुणाईसाठी रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या वतीने देशभरात रोजगार देण्याचा महासंकल्प करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झालेल्या रोजगार मेळाव्यात महाराष्ट्रातील दोन हजार जणांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मंत्री, अधिकारी उपस्थित होते.



आज देशभरात पायाभूत सुविधा, माहिती-तंत्रज्ञान आणि इतर क्षेत्रांमध्ये सरकार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहे. त्यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. महाराष्ट्रात दोन लाख कोटींपेक्षा जास्त २२५ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पांवर काम सुरू आहे किंवा सुरू होत आहे. महाराष्ट्रात रेल्वेसाठी ७५ हजार कोटी आणि रस्ते विकास प्रकल्पासाठी ५० हजार कोटींचा निधी देण्यात आला आहे, अशी माहिती पंतप्रधान मोदींनी दिली.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, स्टार्टअप, लघु उद्योगांना संभाव्य आर्थिक मदत सरकार देत आहे, जेणेकरून तरुणाईला आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. सरकारच्या प्रयत्नांमधून रोजगाराच्या संधी दलित, आदिवासी, महिलांना समान स्वरूपात उपलब्ध होत आहे.

गेल्या आठ वर्षांत आठ कोटी महिला सेल्फ हेल्प ग्रुपशी जोडल्या गेल्या आहेत. त्यांना साडेपाच लाख कोटींची मदत देण्यात आली आहे. या ग्रुपशी जोडलेल्या महिला इतर महिलांनाही रोजगार देत आहेत, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

केंद्र सरकार पायाभूत सुविधांवर खर्च करीत असताना त्यातून रोजगाराच्या लाखो संधी निर्माण होतात. भविष्यात महाराष्ट्रात तरुण-तरुणींसाठी रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही पंतप्रधानांनी या वेळी व्यक्त केला.

**येत्या आठवडाभरात राज्याच्या गृहविभागामार्फत साडेअठरा हजार जागांसाठी पोलीस भरतीची जाहिरात निघणार आहे. याशिवाय ग्रामविकास विभागामार्फतदेखील महिनाभरात साडेदहा हजार पदे भरली जाणार आहेत.**
**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

*राज्यातील तरुणांच्या रोजगाराच्या पूर्ततेची सुरुवात राज्य सरकारने केली आहे. केंद्र सरकार आपल्या केंद्रीय विभागात १० लाख नोकऱ्या देणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूचना केल्यानंतर आपल्या राज्यात तरुण-तरुणींना रोजगार देणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने महाराष्ट्र सरकार ७५ हजार जागा भरणार आहे. नोकरभरतीच्या प्रक्रियेसाठी दोन एजन्सी आपण नेमल्या आहेत. त्यापैकी एक टीसीएस आणि दुसरी आयबीपीएस आहे. आधी सर्व गोष्टींची पडताळणी झाली पाहिजे अशा सूचना आम्ही कंपन्यांना दिल्या आहेत.*

## राज्यात अनेक नवे उद्योग येणार -मुख्यमंत्री शिंदे



मुंबईत आयोजित रोजगार मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात अनेक नवे उद्योग आणत असल्याची माहिती दिली. दोन-तीन प्रकल्प कुठे गेले हे आरटीआयमधून समोर आले आहे. त्यातून सत्य समोर येईल. प्रकल्प का गेले? कोणामुळे गेले? कधी गेले? हे समोर येईल. उपमुख्यमंत्र्यांनीही पुराव्यानिशी मांडले आहे, असे सांगून आम्ही नवे उद्योग आणत असून त्यात राज्याचे हित आहे. त्यामुळे राज्यातील तरुणांना फायदा होईल. राज्य स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकार राज्य सरकारच्या पाठीशी आहे. राज्याला केंद्राकडून विकासासाठी निधी मिळत आहे. गेल्या वेळी प्रस्ताव पाठवला असता १४ हजार कोटी मंजूर करण्यात आले. एक रुपयाही कमी केला नाही, अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, सरकार बदल्यानंतर चैतन्य आले आहे. सर्व सण साजरे होत असून आनंदाचा शिधाही आम्ही दिला, पण काही ठिकाणी पोहचला नाही म्हणून लगेच त्याच्यावर बोट ठेवण्यात आले. राज्यात एक नकारात्मकपणा होता, त्यात आम्ही सकारात्मकपणा आणला आहे. मी व उपमुख्यमंत्री आम्ही दोघे धडाधड निर्णय घेतले. आमचे गतिमान सरकार असून नवीन उद्योग आणण्याचा प्रयत्न आहे.

जपानच्या कंपनीने बीकेसीत दोन हजार ६७ कोटींमध्ये जागा घेतली आहे. ते ५०० कोटी खर्च करणार आहेत. यामधून पाच ते सहा हजार लोकांना नोकऱ्या मिळतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. बीकेसीत परदेशी गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.



## पनवेल परिसरातील रस्ते होणार खड्डेमुक्त!

**पनवेल : प्रतिनिधी**

पावसाळा संपताच पनवेल महापालिका क्षेत्रातील पनवेलसह नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघरमधील रस्ते दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे लवकर रस्ते खड्डेमुक्त होतील

खारघरमधील काही रस्ते जे सिडकोकडे होते त्या रस्त्यांचे पनवेल महापालिकेच्या व सिडकोच्या अभियंत्यांनी संयुक्तपणे सर्वेक्षण केले. सिडकोच्या अभियंत्यांसोबत महापालिकेने चर्चा केली. त्यानुसार ज्या रस्त्याचा डिफेक्ट लायब्लिटी पिरीयड अजून शिल्लक आहे, तेथील काम सिडकोचे कंत्राटदार करणार आहेत.

पनवेल शहरात सध्या आनंद नगरमधील आदर्श हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, जय भारत नाका रस्ते दुरुस्तीचे काम झाले आहे, तर आगरी समाज हॉल ते गावदेवी मंदिर रस्ता दुरुस्तीचे काम सुरू आहे.

कामोठ्यात खांदेश्वर स्टेशन परिसर से. २५जवळील अक्षर बिल्डिंग येथील रस्ते दुरुस्तीचे काम सुरू झाले आहे. खारघरमधील थ्री मंकी पॉईंट ते उत्सव चौक, से. ४मधील रस्ते दुरुस्ती सुरू आहे. कळंबोलीत से. १५मधील मुख्य रस्त्यांच्या दुरुस्तीस सुरुवात झाली आहे. नवीन पनवेल पोदी येथील रस्ते दुरूस्तीचे कामही सुरू करण्यात आले आहे.

या वर्षी झालेल्या प्रचंड पावसामुळे महापालिका क्षेत्रातील अनेक रस्ते खराब झाले आहेत. या सर्व रस्ते दुरुस्तीच्या कामाची जबाबदारी आयुक्त गणेश देशमुख यांनी कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविली आहे. येत्या महिनाभरात ही रस्ता दुरुस्तीची कामे पूर्ण होतील, असे शहर अभियंता संजय जगताप यांनी सांगितले.

## निवडक

### गुजरात विधानसभा निवडणुकीची घोषणा; १, ५ डिसेंबरला मतदान

**नवी दिल्ली** : गेल्या २५ वर्षांपासून भाजपची सत्ता असलेल्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचे 'होम ग्राऊंड' असणाऱ्या गुजरात विधानसभा निवडणुकीची घोषणा गुरुवारी (दि. ३) केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. यानुसार तेथे १ आणि ५ डिसेंबर अशा दोन टप्प्यांत मतदान होणार असून ८ डिसेंबरला निकाल जाहीर होईल.

### 'इपीएफओकडून खातेदारांना पीएफसंदर्भात दिलासा

**नवी दिल्ली** : पीएफ खातेधारकांकडून कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या (ईपीएफओ) ट्विटर हँडलवर व्याजदरासंदर्भात विचारणा केली जात होती. या संदर्भात ईपीएफओने स्पष्टीकरण दिले आहे. कोणत्याही खातेधारकाचे व्याज व्यपगत झालेले नाही. सर्व खातेधारकांच्या खात्यांमध्ये व्याजाची रक्कम जमा केली जात आहे. ईपीएफओच्या सॉफ्टवेअरमध्ये काही तांत्रिक बदल केले जात असल्याने खातेदारांच्या अकाउंट स्टेटमेंटमध्ये ही रक्कम जमा झाल्याचे दिसत नाही, असे ईपीएफओकडून सांगण्यात आले आहे.

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी चित्रा वाघ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पक्षाच्या प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षपदी चित्रा वाघ यांची नियुक्ती केली आहे. भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी वाघ यांना प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र प्रदान केले.

या वेळी प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, विक्रांत पाटील व मावळत्या महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आमदार उमा खापरे उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चित्रा वाघ यांना नव्या नियुक्तीबद्दल शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, चित्रा वाघ यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा महिला मोर्चा संघटनात्मकदृष्ट्या अधिक बळकट होईल तसेच विविध पक्षांमधील महिला कार्यकर्त्या भाजपशी जोडल्या जातील, अशी अपेक्षा आहे.

महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल चित्रा वाघ म्हणाल्या की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महिलांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. ते राज्यातील महिलापर्यंत पोहचविण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून करण्यावर आपण भर देऊ.



## अंधेरी पोटनिवडणुकीत अत्यंत कमी मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीकडे मतदारांनी पाठ फिरविली. येथे गुरुवारी (दि. ३) सायंकाळी ५ वाजेपर्यंत २८.७७ टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत पाटील यांनी दिली.

अंधेरी पोटनिवडणुकीत भाजपच्या माघारीनंतर ही लढत म्हणजे केवळ औपचारिकताउरली आहे. आमदार रमेश लटके यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने या पोटनिवडणुकीसाठी त्यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्यात आली, तर भाजपकडून मुरजी पटेल यांनी अर्ज भरला होता, पण भाजपने महाराष्ट्राची संस्कृती जपत आपला उमेदवार मागे घेतला. या निवडणुकीचा निकाल ६ नोव्हेंबरला लागणार आहे.



**पनवेल : ६०व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ या संस्थेच्या 'तुंबई' या नाटकाला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले असून नुकताच मुंबईत पारितोषिक वितरण समारंभ झाला. या यशाबद्दल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांनी सर्व टीमचे अभिनंदन केले. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शहर अध्यक्ष जयंत पगडे आदी उपस्थित होते.**

## कार्तिकी यात्रेसाठी पंढरी सजली

**पंढरपूर : प्रतिनिधी**



कार्तिकी एकादशी यात्रेचा महासोहळा शुक्रवारी (दि. ४) असून यानिमित्ताने पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. कार्तिकी एकादशीची महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते होणार असून आषाढी आणि कार्तिकी अशा दोन्ही पूजा करायचा मान मिळविणारे हे राज्यातील पहिले दाम्पत्य ठरणार आहे.

कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरचे विठ्ठल मंदिर १५ प्रकारच्या तब्बल सहा टन फुलांच्या आकर्षक सजावटीने सजले आहे. पुणे येथील भाविक राम जांभुळकर व सहकारी कारागिरांनी विठ्ठल सभामंडप, रुक्मिणी सभामंडप, महाद्वार, विठ्ठल सोळखांबी, चौखांबी या ठिकाणी फुलांची सजावट केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजा होणार आहे. या वेळी त्यांच्यासोबत आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री संदीपान भुमरे, खासदार रणजित निंबाळकर, आमदार समाधान अवताडे उपस्थित असतील.

विठ्ठलाच्या पूजेनंतर रुक्मिणीमातेची पूजा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाल्यावर विठ्ठल सभामंडपात उपमुख्यमंत्री आणि मानाच्या वारकरी दाम्पत्याचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार होणार आहे. त्यानंतर राज्यभरातून आलेल्या भाविकांना दर्शन घेता येईल.



# मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम

## १० नोव्हेंबरला सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा



**अलिबाग : प्रतिनिधी**

मतदारयादीमध्ये नव्याने नाव नोंदणीसाठी ९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर या कालावधीत केंद्रीय निवडणूक आयोग विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहीम राबविणार आहे. या मोहिमेत १ जानेवारी २०२३ रोजी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या मतदारांची नाव नोंदणी करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगडच्या उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे यांनी गुरुवारी (दि. ३) दिली.

सन २०२३पासून दरवर्षी १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर या चार अर्हता दिनांकानुसार व त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या नागरिकांना मतदारयादीत आगाऊ नाव नोंदणी करता येणार आहे. त्यासाठी या मोहिमेत आगाऊ अर्ज सादर करता येतील.

भटक्या व विमुक्त जमाती, तृतीयपंथी, देहविक्रीव्यवसाय करणाऱ्या महिला यांची नावेदेखील या मोहिमेत मतदारयादीत नोंदवून घेण्यात येणार आहेत. १० नोव्हेंबर रोजी सर्व ग्रामपंचायतींमध्ये मतदारयादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासाठी एका विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे. १२ व १३ नोव्हेंबर रोजी तसेच २६ व २७ नोव्हेंबर रोजी मतदारयादीत नाव नोंदणीसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात २२ लाख ५६ हजार ८६९ मतदार आहेत. त्यापैकी १० लाख ७७ हजार ९६६ मतदारांनी आपले मतदार ओळखपत्र आधार क्रमांकाशी जोडून घेतले आहे. कोकण विभाग शिक्षक मतदारसंघासाठी शिक्षक मतदारांची नाव नोंदणी केली जात आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत चार हजार ६०८ शिक्षकांनी मतदारयादीत नाव नोंदणी केली आहे, असे उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे यांनी सांगितले.

# नगरमधील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत अहमदनगर जिल्ह्यातील युवा नेते महेश झोडगे, गणेगावचे सरपंच अमोल भनगडे, नागरदेवीचे सरपंच राम पानमखकर, पंचायत समिती सदस्य सोनू भुजबळ, भागचंद तागडकर, संदीप जाधव, दत्ता फुलारी, मयूर सोनवणे यांच्यासह असंख्य ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

माजी आमदार शिवाजी कर्डीले यांच्या पुढाकाराने हा पक्षप्रवेश झाला. या वेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष राम शिंदे, सरचिटणीस विक्रांत पाटील, माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी या कार्यकर्त्यांचे स्वागत केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उद्योग क्षेत्रातही रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती



**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात शासकीय स्तरावर ७५ हजार उमेदवारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासोबतच उद्योग क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी युवकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आणि छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येत आहे, अशी माहिती राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री पाटील बोलत होते. विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, महावितरणचे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता सचिन तालेवार, बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता सुनील पावडे, कोल्हापूरचे परेश भागवत उपस्थित होते. या वेळी ना. पाटील यांच्या हस्ते नवनियुक्त ३१६ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले.

राज्यातील युवकांना रोजगार देण्यासाठी रिक्त पदे भरण्यासोबत आवश्यक नवी पदे निर्माण करण्याच्या सूचना विविध विभागांना देण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्यात एकाचवेळी सहा ठिकाणी अशा स्वरूपाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील दोन हजार ३३ उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येत आहे. बेरोजगारी दूर करणे, चांगले, अनुभवी, कुशल मनुष्यबळ प्रशासनात आणणे आणि राज्याच्या प्रगतीला गती देणे हा यामागचा उद्देश आहे, असे ना. चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

कायद्याची आणि शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी प्रशासनाची आहे. नवनियुक्त उमेदवारांनी क्षमतेने काम करीत प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून नागरिकांना सेवा देण्याचे कार्य करावे, असेही ना. पाटील म्हणाले.

विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले की, राज्य शासनाने एका वर्षात ७५ हजार युवकांना रोजगार देण्याचा 'महासंकल्प' केला असून त्या अंतर्गत पहिल्या टप्प्यात पुणे विभागामध्ये ऊर्जा, परिवहन आणि ग्रामविकास विभागात एकूण ३१६ पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्राचे वितरण करण्यात येत आहे.

# महिलेला मारहाण करणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलचे निलंबन

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात काही दिवसांपूर्वी एका महिलेला पोलीस कॉन्स्टेबलने मारहाण केली होती. त्या महिलेने या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर आता संबंधित कॉन्स्टेबलवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचे निलंबन करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली.

पुण्यातील मंडईमध्ये बांगड्यांचे दुकान चालवणाऱ्या महिलेला मारहाण करण्यात आली होती. त्यात पोलीस कॉन्स्टेबलचा सहभाग होता, असा आरोप त्या महिलेने केला होता. मारहाणीमध्ये महिलेच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली होती. महिलेने पोलीस कॉन्स्टेबलला नो पार्किंगमध्ये गाडी लावण्यास विरोध केला होता. त्यामुळे तिला मारहाण करण्यात आली. राहुल शिंगे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या कॉन्स्टेबलचे नाव असून त्याच्यावर निलंबनाची कारवाईदेखील करण्यात आली आहे.

# मध्य रेल्वेवरील सेवा विस्कळीत

**कर्जत** : नेरळ रेल्वेस्थानकात कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या एका मालगाडीच्या इंजिनात बिघाड झाल्याने गुरुवारी (दि. ३) सकाळी मध्यरेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली.

कर्जतहून मुंबईकडे जाणारी लोकल सेवा विस्कळीत झाली. जवळपास अर्धा तास हा बिघाड दुरुस्त करण्यासाठी लागला आणि त्यानंतर मालगाडी पुढे रवाना करण्यात आली, मात्र त्यामुळे सीएसएमटी दिशेने जाणाऱ्या लोकल काही काळ १० ते १५ मिनिटे उशिराने धावत होत्या.

# 'वीज कामगारांच्या प्रश्नांबाबत राज्य सरकार सकारात्मक'

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्रातील वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांचे अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर मागील सरकारने पुर्णपणे निष्क्रीयता दाखविल्यामुळेच कामगारांचे प्रश्न प्रलंबितच राहिले आहेत.



त्यामुळे प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघासोबत लवकरच सविस्तर बैठक आयोजित करून निश्चीतच कामगारांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उर्जा मंत्री यांनी महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ)च्या शिष्टमंडळाला मंगळवारी (दि. १) मुंबई येथे झालेल्या बैठकीत दिले.

या शिष्टमंडळात कोथरुड विधानसभा माजी आमदार व राष्ट्रीय महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, संघांचे ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णा देसाई, संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरूण पिवळ, उपमहामंत्री प्रशांत भांबुर्डेकर आदी उपस्थित होते.

उरण तालुक्यातही अनेक कंत्राटी कामगार आहेत. मागण्या पूर्ण झाल्यास संपूर्ण राज्यासह वाशी सर्कलमधील कंत्राटी कामगारांना याचा फायदा होणार आहे. उरण तालुका, खारघर, नेरूळ, पनवेल तालुका आदी परिसर वाशी सर्कलमध्ये मोडत असून वाशी सर्कलमध्ये ५११ कंत्राटी कामगार कार्यरत आहेत.

# राष्ट्रवादीच्या आणखी एका पदाधिकाऱ्याचा राजीनामा

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) राजेंद्र वैद्य यांनी तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला. या धक्क्यातून अद्याप कार्यकर्ते सावरलेले नसताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हा अध्यक्षा बेबीताई उयके यांनीही प्रदेशाध्यक्षाकडे राजीनामा पाठविला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राष्ट्रवादीच्या बेबीताई उईके या सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी राजकारणात स्वतःची ओळख निर्माण केली. स्वतःला पक्षासाठी झोकून दिले. सर्वसामान्यांचे प्रश्न त्यांनी हिरहिरीने प्रशासनासमोर मांडले आहेत. त्यांच्या नेतृत्वात अनेक आंदोलनेही झालीत. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे उईके यांनी राजीनामा पाठविला आहे. राजीनामा देण्यामागे त्यांनी वैयक्तिक कारण सांगितले आहे.

# युवतींच्या स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा उपक्रम गावोगाव पोहचवा

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी काम सुरू केले आहे. सरकारला साथ देण्याच्या हेतूने भारतीय जनता पक्षातर्फे युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी सुरू केलेला उपक्रम स्वागतार्ह असून तो गावोगाव पोहचवावा, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. ३) केले.

महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाच्या बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठतर्फे आयोजित स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष बावनकुळे बोलत होते. प्रदेश सरचिटणीस ॲड. माधवी नाईक, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रकोष्ठ संयोजक डॉ. शुभा पाध्ये व सहसंयोजक विनय त्रिपाठी समवेत उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, युवती प्रशिक्षण घेऊन स्वतःचे स्वतः संरक्षण करू शकतात. त्यासाठी भाजपच्या बेटी बचाओ बेटी पढाओ प्रकोष्ठने स्वागतार्ह उपक्रम सुरू केला आहे. महिलांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वास वाढणे आवश्यक आहे. प्रकोष्ठने हा उपक्रम राज्याच्या सर्व भागात प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवावा. पक्ष संघटना त्यासाठी पाठबळ देईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला जगभर मान्यता मिळाली आहे. त्यांच्यामुळे सर्व देशात भारतीय पासपोर्टला महत्त्व आले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी निवडणुकीत मतदान करण्याची गरज आहे. त्यासाठी १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवतींनी मतदार नोंदणी अवश्य करावी. स्वसंरक्षणाच्या प्रशिक्षणाच्या मोहिमेसोबत नवमतदारांच्या नोंदणीची मोहीमसुद्धा सुरू केली पाहिजे, असेही बावनकुळे म्हणाले.



**मुंबई : भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी भाजप प्रदेश कार्यालयात लोकसभा प्रवास योजना बैठक झाली. या बैठकीला भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व लोकसभा प्रवास योजना अभियान संयोजक माजी मंत्री बाळा भेगडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

# ठोस आश्वासन न घेता एसटी आगारातील उपोषण आंदोलन मागे

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल एसटी आगार बीओटी तत्त्वावर बांधण्यासाठी विलंब होत असल्याचे सांगत प्रवासी संघटनेतर्फे गुरुवारी (दि. ३) उपोषण आंदोलन करण्यात आले, मात्र कोणतेही ठोस आश्वासन न घेता ते मागे घेण्यात आले.

पनवेल एसटी आगाराचे काम १ नोव्हेंबरपर्यंत सुरू न झाल्याने प्रवासी संघाने गुरुवारी सकाळी आगारात उपोषण आंदोलन केले. या वेळी एसटीच्या मुंबई विभागाचे कार्यकारी अभियंता विजय रेडेकर यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन कामाला उशीर का झाला याची माहिती देण्याचा प्रयत्न केला, पण ते नवीन असल्याने त्यांनी आठ दिवसांत पत्र देऊन बैठक आयोजित करणार असल्याचे सांगितल्यावर उपोषण आंदोलन मागे घेण्यात आले. अवघ्या काही तासांत उपोषण आंदोलन आटोपले.

# सर्वसामान्यांसाठी याच महिन्यात उपलब्ध होणार डिजिटल चलन

## आरबीआय गर्व्हनर शक्तिकांत दास यांची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी बुधवारी (दि. २) एक मोठी घोषणा केली. या महिन्यापासून सर्वसामान्य ग्राहकांसाठी ई-रूपी व्यवहाराची सुविधा सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी फिक्की आणि इंडियन बँक्स असोसिएशनच्या कार्यक्रमात बोलताना सांगितले.

सध्या पायलट प्रोजेक्ट अंतर्गत डिजिटल चलनाची चाचणी सुरू असून त्यात नऊ बँकांचा सहभाग आहे. आता हे बँकांसाठी जारी केले गेले आहे, परंतु लवकरच किरकोळ ग्राहकदेखील ई-रूपी सुविधेचा वापर करू शकतील. डिजिटल चलनाची पारदर्शकता राखण्यासाठी काम सुरू असून लवकरच त्याचा देशभरात वापर सुरू होईल, असे शक्तिकांत दास म्हणाले.

आम्ही डिजिटल चलन लाँच करण्याची कोणतीही घाई करीत नाही. सामान्य ग्राहकांना उपलब्ध करून देण्यापूर्वी सर्व पैलू तपासायचे आहेत. जागतिक अर्थव्यवस्था सध्या मोठ्या बदलातून जात असून सर्व मोठे देश आपली आर्थिक धोरणे बदलत आहेत. हे चलन आल्यानंतर भारतातील व्यवसाय क्षेत्रात मोठे बदल होणार आहेत, असेही दास यांनी सांगितले.

# 'कोमसाप'तर्फे पनवेलमध्ये साहित्यिक गप्पा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद, पनवेल, के. गो. लिमये वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'साहित्यिक गप्पांचा कार्यक्रम' अतिशय दिमाखदार आणि उत्साही वातावरणात झाला. के. गो. लिमये वाचनालयात झालेल्या या कार्यक्रमात साहित्यिक, साहित्य प्रेमी आणि वाचक यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या कार्यक्रमात डॉ. अविनाश पाटील, मीनल वसमतकर, सुभाष कुडके, नागनाथ डोलारे, माधुरी थळकर, शिवाजी मोटे, रंजना करकरे, दिवाकर वैशंपायन, राजकुमार ताकमोघे, काशिनाथ जाधव, दत्तात्रेय जाधव अशा पनवेल परिसरातील अनेक होतकरू लेखक-लेखिका आणि साहित्यप्रेमी यांनी आपल्या आयुष्यातील साहित्याविषयीचे अनुभव आणि साहित्यिक वाटचाल यावर विचार व्यक्त केले. या वेळी लेखिका मंगला कुलकर्णी, प्रा. सुजाता राऊत, सुनिता जोशी, ज्येष्ठ गजलकार अे. के. शेख, कोमसाप पनवेल शाखेचे अध्यक्ष रोहिदास पोटे आदी उपस्थित होते.

मान्यवरांमध्ये मंगला कुलकर्णी, प्रा. सुजाता राऊत, ज्येष्ठ गजलकार अे. के. शेख, के. गो. लिमये वाचनालयाच्या अध्यक्षा सुनिता जोशी यांनी आपला साहित्यातील प्रवास अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिदास पोटे यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत केले. सचिव मोहन तळेकर यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

**सांस्कृतिक कट्टा**

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**गोधडी आपली संस्कृती**

(५ नोव्हेंबर, स. ११.३० वा.)

# धुतूम शाळेत वर्गखोल्यांचा विस्तार

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन






**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील धुतूम गावातील जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या विस्ताराचे काम करण्यात आले. जिल्हा परिषद रायगड यांनी विहित केलेल्या निविदा प्रक्रियेनुसार धुतूम ग्रामपंचायतीमार्फत कामाचे वाटप करण्यात आले असून, पहिल्या मजल्यावर एकूण चार वर्ग खोल्या बांधल्या आहेत. एकूण ३५ लाख रुपये खर्चातून बांधण्यात आलेल्या या खोल्यांचे उद्घाटन उरणचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते व उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

आमदार महेश बालदी यांनी धुतम ग्रामपंचायतीने आयओटीएल कंपनीकडून सीएसआर निधी आणून गावासाठी चांगले प्रकल्प विकसित केल्याबद्दल सरपंच रेश्मा ठाकूर, उपसरपंच शरद ठाकूर आणि ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी व्ही. आर. म्हात्रे आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले. ओपन जिम, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, वॉटर एटीएम इत्यादी प्रकल्पांसाठी आयओटीएल व्यवस्थापनाने धुतुम ग्रामपंचायतीला दिलेला संपूर्ण पाठिंबा आणि सीएसआर अंतर्गत आजूबाजूच्या सर्व गावांना दिलेल्या समर्थनासाठी आयओटीएल व्यवस्थापनाचे कौतुक केले.

या ३५ लाखांच्या चार वर्ग खोल्यांच्या निर्मितीसाठी आयओटीएल कंपनीने ३० लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तर उर्वरित पाच लाख रुपये निधी सीबर्ड मरीन सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीने उचलला आहे. या वेळी आयओटीएलचे नवीन चंद्र, संयुक्त अध्यक्ष एचआर, अतुल खराटे, उपाध्यक्ष कॉर्पोरेट संबंध, भूपेश शर्मा, नवघर टर्मिनलचे टर्मिनल इन्चार्ज, शिशिर कुमार जीएम प्रशासन आणि सीएसआर, मिलिंद मोघे, सल्लागार आय. आर आणि आयओटीएल नवघर टर्मिनलचे इतर अधिकारी उपस्थित होते.

यासोबतच या कार्यक्रमासाठी धुतूम ग्रामपंचायत सरपंच रेश्मा ठाकूर, सदस्य सदानंद ठाकूर, अंगत ठाकूर, रविनाथ ठाकूर, सदस्या वैशाली पाटील, आशा ठाकूर, सविता ठाकूर, निर्मला ठाकूर, पूजा पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे सभापती करुणा घरत, उपसभापती अभय ठाकूर, सद्स्य नितीन ठाकूर, शैलेश ठाकूर, कैलास राजाराम घरत, धरती तांडेल, संतोष तांडेल, माजी सरपंच धनाजी ठाकूर, शंकर ठाकूर, अमृत ठाकूर, प्रभाकर ठाकूर, प्रकाश ठाकूर, गोपीनाथ म्हात्रे, सुनील ठाकूर, नंदेश ठाकूर, अरुण ठाकूर, करण ठाकूर, दत्ता ठाकूर, दत्तात्रेय भिवा ठाकूर, रामचंद्र ना. ठाकूर, अनिल ठाकूर, विकास ठाकूर, निवास ठाकूर, हौसाराम ठाकूर, चंद्रकांत कडू, अर्जुन ठाकूर, प्रभाकर एकनाथ ठाकूर, रोशन ठाकूर, समिता ठाकूर, प्रतीक्षा ठाकूर, अलका ठाकूर, रेखा ठाकूर, मथुरा ठाकूर, राम अंबु ठाकूर, चंदन ठाकूर, राजेश ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक मोकाशी सर व शिक्षक वृंद, ग्रामसेवक वि. आर. म्हात्रे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत उपसरपंच शरद ठाकूर यांनी केले, तर सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.

दरम्यान, कंपनीचे अतुल खराटे यांनी सरपंच व उपसरपंचांनी धुतूमच्या विकासात्मक कामांसाठी केलेल्या समर्पणाचे कौतुक केले. आपल्या भाषणात त्यांनी आतापर्यंत केलेल्या प्रकल्पांच्या दीर्घकाळ टिकाव धरण्यासाठी त्यांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्याची सूचना केली. धुतुम ग्रामस्थांसाठी उपयुक्त प्रकल्पांसाठी आयओटीएल व्यवस्थापनाच्या वतीने भविष्यात ग्रामपंचायतीला सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# नवीन पनवेलच्या रेशनिंग दुकानात मनमानी

## परवाना रद्द करण्यात यावा; भाजपची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर ३ येथील रेशनिंगच्या दुकानात मनमानी पद्धतीने कारभार सुरू असून या दुकानाचा परवाना रद्द करण्याची मागणी भाजपचे प्रभाग क्रमांक १६चे अध्यक्ष शिवाजी भगत यांनी केली आहे. तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यासमवेत तहसीलदार यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे शिवाजी भगत यांनी सांगितले आहे.



सर्वसामान्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठी फक्त १०० रुपयांमधे प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्यतेल राज्य सरकारकडून नागरिकांना देण्यात येतोय, मात्र नवीन पनवेल पनवेल सेक्टर ३ येथील रेशनींग दुकानात मात्र हा शिधा १० रुपये जास्त किमतीने नागरिकांना देण्यात येतोय. रुपा सावंत हे रेशनींचे दुकान चालवत असून ते आनंदाचा शिधा ११० रुपयांना देयाच्या तसेच तेल न देता त्याच्याबदली रवा देत होत्या. नागरिकांनी विचारणा केली असता त्यांना आरेरावीच्या भाषेत उत्तर मिळत होते. या संदर्भात ४० ते ५० महिलांनी तक्रार केली होती.

या पार्श्वभूमीवर भाजपच्या शिवाजी भगत यांनी या दुकानाला भेट देत जाब विचारला. तसेच या समस्येबाबत त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल व माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्याशी चर्चा केली. यानुसार ते आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत पनवेलच्या तहसीलदारांची भेट घेऊन ह्या रेशनींगच्या दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबात चर्चा करणार असल्याचे भगत यांनी सांगितले. तत्पुर्वी या रेशनींगच्या दुकानातून ज्यांनी सामान घेतले होते त्यांनी ते परत करून आपले पैसे परत घेतले.

या वेळी अक्षय सिंग, विवेक होन, शक्ती केंद्र प्रमुख कुलबीर चंडोक, मयुरे आंग्रे, शोभा सातपुते, विठाबाई सावंत, रिमा रावल, परीघा झांबरे, मुजावर अल्ताफ, रामदास गोवारी, स्वप्नाली बंद्रे, ज्ञानदेव दळवी, आशा गुप्ता, गीता चौधरी, दीपक मातोंडकर, कमल भगत आदी उपस्थित होते.



**पनवेल : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेले पळस्पे येथील घनश्याम गवंडी यांना पोलीस हवालदारपदी बढती मिळाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घनश्याम गवंडी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# उरणकरांना आजारांनी ग्रासले; ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील जनतेला सध्या सर्दी, खोकला, ताप, काविळ, मलेरिया यासारख्या आजारांनी ग्रासले आहे.

उरणच्या ग्रामीण भागात येणाऱ्या वशेणी तीन, खोपटे दोन, कोप्रोली तीन, सारडे एक, पाले एक व चिरनेर दोन रुग्ण हे डेंग्यू आजारांनी ग्रस्त होते. हे सर्व रुग्ण उपचारासाठी उरण तालुक्यातील कोप्रोली येथील श्री सिद्धिविनायक रुग्णालयात दाखल झाले होते. आता त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे, त्यांना घरी सोडण्यात आले आहेत. परीणामी येथील रहिवाशांमध्ये सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उरण तालुक्याचे औद्योगिकरण झपाट्याने वाढत असल्याने, अशा वाढत्या औद्योगिकरणामुळे प्रदूषणातही तेवढ्याच प्रमाणात वाढ होत आहे. अशा वाढत्या औद्योगिकरणामुळे व प्रदूषणामुळे तालुक्यात जीवघेण्या कॅन्सरच्या तसेच हृदयविकाराच्या रुग्णांतदेखील दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे या तालुक्यात आधुनिक रुग्णालयाची उभारणी लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी वारंवार येथील जनता व सामाजिक संघटना करीत आहेत. त्यात नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाच्या हवामानातील बदलामुळे उरण तालुक्यातील जनतेला सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, काविळ, आणि आता मलेरिया, डेंग्यूसारख्या इतर आजारांनी ग्रासले आहे. हे चित्र खासगी, शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल होणाऱ्या रुग्णांच्या संख्येतून, पुढे येत आहे.

सध्या येथील शासकीय रुग्णालयात असणाऱ्या सुविधांच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना उपचारासाठी, पनवेल, नवी मुंबई शहरातील रुग्णालयात जावे लागते. त्यामुळे उरणमध्ये आधुनिक रुग्णालयाची उभारणी लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी येथील ग्रामीण जनतेतून होत आहे.

दरम्यान, उरण तालुक्यामध्ये सुसज्ज व आधुनिक सोईसुविधांयुक्त रुग्णालय व्हावे, यासाठी आमदार महेश बालदी यांच्याकडून प्रयत्न व पाठपुरावा सुरू आहे.

# आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा -अरुणशेठ भगत

## गव्हाण विद्यालयात दहावी बोर्ड परीक्षेसाठी अर्ज भरण्यास सुरुवात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी ताण न घेता जमेल, झेपेल अशा तणावमुक्त तऱ्हेने परंतु आत्मविश्वासाने आपल्या जीवनातील पहिल्या सार्वजनिक परीक्षेस अर्थात एसएससी. परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेजमध्ये एस.एस. सी.परीक्षा मार्च २०२३ अर्थात इयत्ता दहावीच्या परीक्षार्थींच्या बोर्ड परीक्षेचा अर्ज भरण्याच्या शुभारंभ झाला. या वेळी अध्यक्ष पदावरून बोलताना विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी एस.एस.सी.बोर्ड परीक्षा ही व पालकांसाठीही तितकीच महत्त्वपूर्ण असते. विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक, पालक, शाळा समिती व समाजाने आपल्यासाठी केलेल्या त्यागाची जाण ठेवून चांगला अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

स्थानिक शाळा समितीचे सदस्य विश्वनाथ कोळी यांचेही या वेळी समायोजित भाषण झाले. प्रारंभी इयत्ता दहावीमधील विद्यार्थिनी दिया दिनेश कोळी, हुस्नबानो शेख व आरती शेजुळ या विद्यार्थिनींनी मराठी व इंग्रजी भाषेतून आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज सुपूर्द करण्यात आले व मिठाईचे वाटप करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमास स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, इयत्ता दहावीच्या वर्ग शिक्षिका चित्रलेखा पाटील, संदीप भोईर व सागर रंधवे तसेच जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे व उपशिक्षक देवेंद्र म्हात्रे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता दहावीची विद्यार्थ्यांनी श्वेता बाबासाहेब घाडगे हिने केले. सूत्रसंचालन इयत्ता दहावीचीच विद्यार्थिनी किरण जैसवार हिने केले तर उपशिक्षक सागर रंधवे यांनी आभार मानले.



**पनवेल : भाजप कार्यकर्त प्रथमेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, सदाशेठ पाटील उपस्थित होते.**

# उरणच्या चिर्लेत मंगळवारी इंदोरीकर महाराजांचे कीर्तन

**उरण : बातमीदार**

श्री सत्यनारायण महापूजेचे औचित्य साधून मंगळवारी (दि. ८) उरण तालुक्यातील चिर्ले गावात ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर महाराज) यांचे सुश्राव्य असे कीर्तन होणार आहे.



श्री सत्यनारायणाची महापूजा सकाळी १० ते १२ आयोजित करण्यात आली आहे. दुपारी २:३० ते ३:३० वा. राधाकृष्ण भजन मंडळ चिर्लेचे भजन, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मराठी शाळेजवळ चिर्ले येथे ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर महाराज) यांचे सुश्राव्य असे कीर्तन, रात्री ८:३० ते ९.३० या वेळेत जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ, केवाळे यांचे भजन असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. भाविक भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक शेखर कृष्णा पाटील, चैतन्य गोवर्धन पाटील (श्री समर्थ मेडिकल चिर्ले) यांनी केले आहे.

# सुरेश पाटील यांच्याकडून कराडी समाज मंडळास देणगी



**उरण : बातमीदार**

कामगार नेते सुरेश कमळाकर पाटील यांनी कराडी समाज उरण या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेस ५१००० रुपयांची देणगी दिली.

सुरेश पाटील हे अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांना मदत करीत असतात ते भारतीय मजदूर महासंघाच्या राष्ट्रीय महामंत्री पदावर कार्यरत असून ते कामगार क्षेत्रात एक धडाडीचे राष्ट्रीय नेते म्हणून उदयास येत आहेत. ते आपल्या अभ्यासपूर्ण व निस्वार्थी भावनेने कामगारांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. अनेक विविध सामाजिक उपक्रमांना नेहमीच त्यांचा हातभार असतो. त्यांच्या या दानशूरपणाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. कराडी समाज मंडळ उरण या संस्थेस सामाजिक भावनेतून देणगी दिल्याबद्दल कराडी समाज मंडळ उरणच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सुरेश पाटील यांचे आभार मानले आहेत.



**पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते अनिकेत खरात यांचा वाढदिवस लोकमान्यनगर येथे बुधवारी साजरा करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, अनुसूचित जाती मोर्चा तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, कार्यकर्ते प्रकाश बोरुडे, किरण वाहुळकर, सर्जेराव साळवे, विजय झिरे, योगेश खरात, विष्णू मंजुळे, उमेश कांबळे, सन्नी साळवे, गणेश जाधव, अजय पवार, सुरज टाक, रुतिक जाधव, करण फुलोरे, आर्यन सिंद, सागर जाधव, रोशन कदम, शेखर इंगळे, शब्बीर शेख, सोहेल शेख, अमन मोरे, राहुल कांबळे, माले मोर्य, राज कांबळे, मनोज झिरे, योगेश वाहुळकर, सिद्धार्थ राऊत, सुरज साळुंके, धनराज कांबळे, अजय जाधव आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# होम पिचवरचा सामना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तुल्यबळ असा नेता संपूर्ण देशात उरलेला नाही आणि भारतीय जनता पक्षाला रोखू शकेल असा पक्षही उरलेला नाही. गुजरात हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे होम पिच आहे. आपले राज्य अबाधित राखणे भाजपसाठी तेथे मुळीच अवघड उरलेले नाही.

इतके दिवस साऱ्यांचे लक्ष लागले होते त्या गुजरात विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम गुरुवारी अखेर जाहीर करण्यात आला. गेल्या महिन्यात हिमाचल प्रदेशच्या निवडणुका जाहीर झाल्या, तेव्हाच गुजरातमधील निवडणुकांची घोषणा का करण्यात आली नाही अशी ओरड विरोधीपक्षांनी केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नियोजित दौऱ्यानंतरच तेथील निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. मोदी-शहा यांना प्रचारासाठी मोकळे रान मिळावे म्हणूनच केंद्रीय निवडणूक आयोगाने गुजरातेतील विधानसभा निवडणुका काहिशा उशीरा जाहीर केल्या असा विरोधीपक्षांचा आक्षेप आहे. तो हास्यास्पदच म्हटला पाहिजे. गुजरातेत १९९५ पासून भारतीय जनता पक्षाचेच राज्य आहे. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात तेथे विकासाचे जे मॉडेल राबवले, त्यामुळे गुजरातची जनता आपल्या नेत्याबाबत शत-प्रतिशत समाधानी आहे. गेली अडीच-तीन दशके गुजरातचे राजकारण भाजप आणि काँग्रेस या दोन धृवांभोवती फिरत होते. यंदा त्यास तिसरा कोन प्राप्त झाला असून तो अर्थातच अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाचा आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत आपने आपले बस्तान गुजरातेत बसवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यांना दखलपात्र यश मिळाले नव्हते. काँग्रेसने गेल्या निवडणुकीत भाजपला चांगली लढत दिली होती हे खरेच. लढत चांगली देऊनही भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यात काँग्रेस अपयशी ठरली, मात्र त्यानंतरच्या पाच वर्षांत गुजरातच्या भूमीवरील राजकारण बरेच बदलले आहे. काँग्रेस पक्ष मजबूत पायावर उभा राहण्याऐवजी अधिकच खिळखिळा झाला आहे. याउलट भाजपची गुजरातेतील नेत्यांची फळी अभेद्य बनत गेली. २०१७ मधील निवडणुकांमध्ये हार्दिक पटेल, जिग्नेश मेवाणी आदी युवा नेते काँग्रेसबरोबर होते. आता हेच नेते भाजपच्या गोटात स्थिरस्थावर होत आहेत. कच्छ आणि सौराष्ट्राच्या परिसरातील अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपल्या पक्षनेतृत्वाच्या निष्क्रियतेला कंटाळून आपचा आसरा घेतला. अर्थात त्यांना भाजपमध्ये जागा उरली नव्हती म्हणून आपचा पर्याय त्यांनी निवडला ही वस्तुस्थिती लक्षात ठेवली पाहिजे. आपच्या अरविंद केजरीवाल यांनी गुजरातेत ठाण मांडून मोदी-शहा यांच्या बालेकिल्ल्यात प्रचाराचा धुमधडाका लावला आहे. सत्तेवर आल्यास अनेक सोयीसुविधा मोफत देण्याचे आमिष ते नेहमीच दाखवतात. दिल्ली आणि पंजाबमध्ये त्यांनी हा रेवडी फॉर्म्युलाच वापरला. सरकारी तिजोरीमधून वाट्टेल तशी उधळपट्टी करत मोफत सोयीसुविधा देण्याच्या उठाठेवीला पंतप्रधान मोदी यांनीच रेवड्या वाटण्याची उपमा दिली होती. केजरीवाल यांचे रेवड्या वाटण्याचे प्रयोग गुजराती जनता कधीही स्वीकारणार नाही. गुजराती मतदारांना जेवढा व्यवहार समजतो तेवढा क्वचितच अन्य कुणाला समजत असेल. मोदींच्या विकासाच्या मॉडेलला प्रत्युत्तर म्हणून केजरीवाल यांनी दिल्लीत राबवलेल्या मोफत वीज आणि मोफत शिक्षणाच्या बाबतीत काही घोषणा करून पाहिल्या. त्याचा त्यांना किती उपयोग होतो हे आता एक आणि पाच डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानानंतरच समजेल. या निवडणुकीचा निकाल खरे तर आताच लागल्यासारखा आहे.

# रेवस-करंजा पूल विकासाला पोषक


**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रेवस-रेड्डी या सागरी महामार्गावरील धरमतर खाडीवरील रेवस ते करंजा बंदराला जोडणारा सागरी पूलाच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे अलिबागला नवी मुंबई आणि मुंबई महानगरीशी जोडणारा हा पूल अलिबागाच्या विकासात महत्वाचा ठरणार आहे. हा पूल येताना विकास घेऊन येणार आहे. हा पूल लवकर पूर्ण होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

रेवस आणि करंजाला जोडणारा चार पदरी खाडीपूल बांधण्यासाठी महामंडळाने एप्रिल २०२२मध्ये रिक्वेस्ट फॉर क्वालिफिकेशनसाठी निविदा मागवल्या होत्या. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता हा पूल बांधण्याची निविदा प्रक्रिया महामंडळाने १९ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू केली आहे. हा पूल पूर्ण झाल्यास प्रवाशांचा वेळ आणि इंधनाचीही खूप मोठी बचत होणार आहे. सध्या रेवस-करंजा प्रवासासाठी वाहन धारकांना ७० किमीचा प्रवास रस्त्याने करावा लागतो. यासाठी दोन तासांचा अवधी लागतो तर जलवाहतुकीसाठी दोन ठिकाणांदरम्यान १५ मिनिटे लागतात, मात्र पावसाळ्यात फेरी बोटसेवा बंद राहात असल्याने प्रवाशांची गैरसोय होते. त्यामुळे हा पूल होणे महत्त्वाचे झाले आहे. या पुलामुळे कोकणच्या पर्यटन क्षेत्राला लाभदायक ठरणार्या रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या कामालाही वेग येणार आहे.

बॅ. ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी १९८० साली उरण आणि अलिबाग या दोन तालुक्यांना जोडण्यासाठी धरमतर खाडीवर रेवस-करंजा पूल बांधण्यासाठी मंजूरी दिली होती. त्याचे कामही सुरू झाले होते. दोन्ही बाजूंना जोड रस्ते बांधण्यात आले होते, परंतु बॅ. अतुलेंचे मुख्यमंत्रीपद गेले आणि हा पूलही बारगळला. अनेक वर्ष या पुलाचे काम रखडले होते. हा पूल लवकरात लवकर बांधला जावा, अशी मागणी केली जात होती, परंतु काही जण हा पुल होण्यापेक्षा तो कसा होणार नाही यासाठीच प्रयत्न करीत होते. पुल बांधण्यापेक्षा खाडीतील गाळ काढण्यावर लक्ष केंद्रीत केले. दरवर्षी रेवस खाडीतल गाळ काढला जातो. त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. एवढी वर्षे या खाडीतील गाळ काढण्यासाठी शासनान खर्च केला त्या खर्चात रेवस-करंजा पूल बांधून झाला असता.



कै. मधुकर ठाकूर आमदार असताना त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे रेवस-करंजा पुलाची मागणी केली होती. ती मान्यदेखील करण्यात आली होती. पुलाच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात आली होती, परंतु पुलाचे काम काही सुरू झाले नाही. आमदार प्रशांत ठाकूर एमएमआरडीएचे सदस्य असताना त्यांनीदेखील या पुलासाठी प्रयत्न केले. एमएमआरडीएनेदेखील या कामसाठी तेव्हा आपल्या अर्थसंकल्पामध्ये या पुलासाठी तरतुद केली होती. त्यामुळे या पुलाचे काम मार्गी लागेल असे वाटत होते, परंतु पुन्हा हा पूल रखडला. आत आमदार महेंद्र दळवी यांनी या पुलाच्या प्रश्नांत लक्ष घालून पूल बांधला जावा यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. हा पुल केवळ अलिबाग व उरण या दोन तालुक्यांना जोडणार असला तरी तो कोकणाच्या पर्यटन विकासाठीदेखील महत्त्वाचा ठरणार आहे.सध्या अलिबागहून उरणला जायचे असेल तर अलिबाग वडखळ-खारपाडा असा प्रवास करावा लागतो.

यात पैसा व वेळेचा अपव्यय होतो. हे टाळण्यासाठी प्रवाशी रेवस-करंजा असा तरीतून प्रवास करतात. पुढे जायचे असल्यास दुसऱ्या वाहनाने प्रवास करावा लागतो. तरीतून मोटरसायकल नेता येते, परंतु मोठी वाहने नेता येत नाहीत. त्यामुळे मोटारीने जायचे असल्यास खारपाडामार्गे च जावे लागते. रेवस-करंजा पूल झालातर हा वळसा घालाव लागणार नाही. रेवस-करंजा पूल सुरू झाल्यास वाशी ते रेवस हे अंतर ३९ कि. मी. कमी होईल. वाशी ते मांडवा हे अंतर ३९ कि. मी., उरण-अलिबाग अंतर ४४ कि.मी.ने, जेएनपीटी-अलिबाग अंतर ३५ कि. मी. ने तर जेएनपीटी-मुरूड अंतर ३६ कि. मी.ने कमी होईल. अलिबाग-मुंबई प्रवास करण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाने प्रवास करावा लागातो. हे अंतरदेखील या पुलामुळे कमी होणार आहे. हे पूल पूर्ण झाल्यावर अलिबाग मुंबईच्या आणखी जवळ येईल.

या पुलामुळे अलिबाग थेट नवी मुंबई-मुंबईशी जोडला जाणार आहे. रेवस ते करंजा हा पूल दोन किमी लांबीचा असणार असून, त्याच्या दोन्ही बाजूला तीन किमी लांबीचे मार्ग असतील. शिवडी आणि रायगडमधील न्हावा-शेवाला जोडणारा मुंबई ट्रान्स हार्बर लिंक कार्यान्वित झाल्यानंतर, हा रेवस-करंजा पूल अलिबाग आणि मुरूडसह कोकणाकडे जाणाऱ्या पर्यटकांना खूप महत्त्वाचा ठरणार आहे. या पुलामुळे अलिबाग थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह जेएनपीटीला जोडले जाणार आहे. रेवस-करंजा हा पूल म्हणजे अलिबाग आणि उरण परिसरासाठी विकासाचा साकव ठरणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान



# फेसबूकसारखंच आता ट्वीटही 'एडिट' करता येणार


ट्विटरचे नवे 'बॉस' इलॉन मस्क मायक्रो-ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म आता अधिक सक्षम करण्यासाठी कामाला लागले आहेत. येत्या आठवड्याच्या सुरुवातीलाच मस्क ट्विटरवर पहिला सर्वांत मोठा बदल म्हणजे युझर्सना ट्विट एडिटचा पर्याय उपलब्ध करून देण्याची दाट शक्यता असल्याची माहिती समोर आली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार कंपनीनं ट्विट एडिटिंग पर्याय लॉक केला होता. जो ४.९९ डॉलरच्या ट्विटर ब्लू सबस्क्रिप्शनसाठी फक्त काही देशांमधील युझर्ससाठी उपलब्ध आहे. आता मस्क यांनी युझर्सना एडिटचा पर्याय उपलब्ध करून दिला तर युझर्सना त्यांनी केलेले ट्विट पब्लिश झाल्यानंतर एडिट देखील करता येणार आहे. ट्विटरनं याआधी पोस्टच्या तळाशी 'Last Edited' असं दर्शविणारं त्यांचं एक ट्विट करून, येऊ घातलेल्या एवळीं बटणाची झलक दाखवली होती.

युझरनं एकदा ट्विट एडिट केलं की त्या ट्विट खाली Last Edited असा पर्याय दिसू लागेल. यावर क्लिक केल्यावर युझरनं आपल्या ट्विटमध्ये नेमका काय बदल केला याची संपूर्ण माहिती मिळू शकणार आहे. महत्वाचं म्हणजे ट्विट एडिट करायची ही सुविधा फक्त ट्विटरच्या ब्लू सबस्क्राइबर्सनाच उपलब्ध होणार असल्याचं याआधीच जाहीर करण्यात आले आहे.

टायपिंकच्या चुका दुरुस्त करणे, चुकलेले टॅग बदलणे आणि इतर काही कारणास्तव ट्विटमध्ये बदल म्हणून या फिचरचा विचार करा, असं ट्विटरनं म्हटलं आहे. आता एडिटेड ट्विट आयकन, टाइमस्टॅम्प आणि लेबलसह दिसतील त्यामुळे वाचकांनाही हे स्पष्टपणे लक्षात येईल युझरनं मूळ ट्विटमध्ये सुधारणा केली आहे.

# आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके



वासुदेव बळवंत फडके हे भारतीय क्रांतिकारक होते. त्यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आद्यक्रांतिकारक किंवा सशस्त्र क्रांतीचे जनक मानले जाते. रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावात जन्मलेल्या फडक्यांचे आजोबा नजीकच्या कर्नाळा किल्ल्याचे किल्लेदार होते. लहानपणीच फडक्यांना कुस्ती, घोडेस्वारी आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण मिळाले.

माध्यमिक शिक्षण संपल्यावर ते पुण्याला आले व सदाशिव पेठेतील नरसिंह मंदिराजवळ राहून इंग्रज सरकारच्या सैन्य लेखा सेवेत भरती झाले. येथे असताना त्यांच्यावर महादेव गोविंद रानड्यांचा प्रभाव पडला व भारताच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारण ब्रिटिश धोरणे होती असे त्यांच्या लक्षात आले. त्याचवेळी फडके हे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवेंच्याही प्रभावात होते. साळव्यांनी ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवण्याचे आणि मागासलेल्या जातींनाही या लढ्यात सामील करून घेणे महत्त्वाचे असल्याचे फडक्यांना पटवून दिले.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके लहानपणापासूनच तडफदार व्यक्तिमत्त्वाचे होते. शिक्षणात त्यांचे मन विशेष रमले नाही. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी प्राथमिक शाळेत प्रवेश केला. हायस्कूल शिक्षणासाठी पुणे गाठून त्यांनी इंग्रजीचे शिक्षण घेतले. त्यांनी रेल्वेत लिपिकाची नोकरी केली. त्यानंतर १८६४ मध्ये लष्कराच्या वित्त विभागात दाखल झाले. यावेळी किरकोळ कारणावरून त्यांचे मतभेद झाले आणि त्यांनी नोकरी सोडून दिली.

ब्रिटिशांच्या दडपशाहीची आणि पारतंत्र्याची जाणीव त्यांच्या मनात जागृत झाली आणि त्यांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध बंड पुकारले. त्यांनी गावोगाव भटकत ब्रिटिशांविरुद्ध असंतोष निर्माण करत बंडाची पार्श्वभूमी तयार केली. गनिमी कावा ही शिवकाळातील युक्ती त्यांनी आपल्या संघर्षासाठी उपयोगात आणली. या माध्यमातून त्यांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले.

ब्रिटिश शासनाने त्यांच्या अटकेसाठी बक्षीस घोषित केली. १८७०-७८दरम्यान पडलेल्या दुष्काळात शेतकर्यांच्या दयनीय परिरिस्थितिविरूद्ध त्यांनी आवाज उठविला. आपल्या तडफदार भाषणातून त्यांनी स्वातंत्र्याची सिंहगर्जना केली. आमसभांच्या माध्यमातून त्यांनी देशाची हलाखीची स्थिती देशवासीयांसमोर मांडली.

स्वातंत्र्यच सर्व समस्यांचे समाधान असल्याचे त्यांचे मत होते. विजापूर जिल्ह्यात २० जुलै १८७९मध्ये त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर पुण्यात तीन नोव्हेंबर १८७९ रोजी राजद्रोहाचा खटला चालवण्यात आला. त्यांना जन्मठेप झाली. तुरूंगात असतानाच क्षयाने त्यांचे निधन झाले. भारतीयात स्वातंत्र्यप्राप्तीची ज्योत जागवण्याचे महान कार्य त्यांनी केले.

जुलै २३, इ.स. १८७९ रोजी विजापूर जवळील देवर नावडगी या गावाच्या बाहेर एका बौद्ध विहारामध्ये गाढ झोपेत असताना त्यांना अटक करण्यात आले व पुण्याच्या तुरुंगात ठेवले. तेथे त्याच्यावर खटला चालवण्यात आला. पुण्यातील एकाही वकिलाने त्यांचे वकीलपत्र घेण्याची तयारी दाखवली नाही. शेवटी सार्वजनिक काकांनी त्यांचे वकीलपत्र घेतले व त्यांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. उच्च न्यायालयात त्यांच्या बचावाचे काम महादेव चिमाजी आपटे यांनी केले. फाशीची शिक्षा टळून त्यांना आजीवन कारावास व तडीपारीची शिक्षा झाली. फडक्यांना येमेन देशातील एडन येथील तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडक्यांनी एके दिवशी आपल्या कोठडीचे दार बिजागऱ्यांसकट उचकटून काढून तुरुंगातून पळ काढला. काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांना परत पकडले व पुन्हा तुरुंगात टाकले. तेथे आपल्याला मिळत असलेल्या वागणुकीविरुद्ध वासुदेव बळवंत फडक्यांनी आमरण उपोषण केले व त्यांचा १७ फेब्रुवारी इ.स. १८८३ रोजी मृत्यू झाला.


**(साभार : विकीपिडीया व बेवदुनिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : जंजिरा माजगाव परिसरात भातशेतीने सोन्याचे रूप साकारले आहे. चांगल्या बहरलेल्या शेतीचे आता पुन्हा अवकाळी पावसाने नुकसान होऊ नये हीच प्रार्थना शेतकरी देवाकडे करीत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर



# केस ओले ठेवून झोपल्यास उद्भवू शकतात 'या' समस्या

आपल्यापैकी अनेक लोक रात्री केस धुणं टाळतात. मात्र आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे सकाळी कामाच्या गडबडीत केस धुवायला वेळच मिळत नाही. याच कारणामुळे अनेक लोक संध्याकाळी किंवा रात्री केस धुतात, पण ओले केस घेऊन झोपण्याची ही सवय तुमच्या केसांसाठीच नव्हे तर आरोग्यासाठीही नुकसानकारक ठरू शकते. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी केस नीट वाळवून झोपले पाहिजे. अन्यथा त्रास सहन करावा लागू शकतो.

**फंगल इन्फेक्शन** – केस ओले ठेवून झोपल्यास टाळूवर बुरशीजन्य संसर्ग (इन्फेक्शन) होण्याचा धोका वाढतो. यामुळे त्वचारोग आणि कोंडा अशा समस्या उद्भवू शकतात. यीस्ट हे शरीराच्या ओलसर ठिकाणी सहजपणे वाढते. यामुळे बुरशीजन्य संसर्गाचा धोकाही वाढू शकतो.

**केस तुटणे** – रात्री झोपताना केस ओले राहिल्यास आपले केस कमकुवत होतात व त्यामुळे केस अधिक तुटतात. जेव्हा आपण केस घट्ट बांधतो किंवा केस ओलसर असतात तेव्हा ते खूप तुटतात. केस ओले ठेवून झोपणे टाळावे.

**थंडीचा त्रास** – केस ओले असताना झोपल्यास केसांचे नुकसान तर होतेच शिवाय आपल्या आरोग्यालाही हानी पोहचू शकते. ओल्या केसांमध्ये झोपल्याने सर्दी होऊ शकते. एका अभ्यासानुसार, रात्री ओले केस घेऊन झोपल्याने शरीराचे तापमान कमी होऊ शकते. याचा आपल्या प्रतिकारशक्तीवर खूप वाईट परिणाम होतो.

**कंडीशनर वापरा** – संध्याकाळी किंवा रात्री केस धुणार असाल तर कंडीशनरचा वापर करावा. यामुळे आपले केस मुलायम राहतात. तसेच झोपताना केसांचा गुंताही होणार नाही. तुम्ही सकाळी केस सहज विंचरू शकाल.

**सिल्कची उशी** – रात्री झोपताना सिल्कच्या उशीचा वापर करावा. त्यामुळे तुमच्या केसांचे नुकसान होण्यापासून बचाव होईल. या उशीमुळे तुमचे केस तुटणार नाहीत. तसेच ते मऊसूत व मुलायम राहतील.

**केसांची स्थिती** – केस फार घट्ट न बांधता ते हलके बांधून झोपण्याचा प्रयत्न करा म्हणजे केस अडकणार नाहीत व खराब होणार नाहीत. अनेक वेळा केस ओले ठेवून झोपल्यास त्यांचा पोत बिघडतो.

# माणगाव बसस्थानक होणार खड्डेमुक्त!

## कॉँक्रीटीकरणाच्या कामाला मंजुरी, युवासेनाप्रमुख विपूल उभारेंच्या प्रयत्नाला यश

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाचे माणगाव बस स्थानक खड्डेमुक्त करावे, या मागणीसाठी बाळासाहेबांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या युवासेनाचे दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्या नेतृवाखाली २२ जुलै रोजी आंदोलन करण्यात आले होते.



त्याची दखल घेत आमदार भरत गोगावले यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे या बस स्थानकाच्या कॉंक्रीटीकरणासाठी १६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. बुधवारी (दि. २) संबंधित ठेकेदाराला कामाची वर्कऑर्डर देण्यात आली. त्यामुळे नजीकच्या काळात माणगाव एसटी बस स्थानक खड्डेमुक्त होणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाच्या माणगाव बसस्थानक आवारात गेल्या काही महिन्यांपासून मोठमोठे खड्डे पडले होत. त्याकडे परिवहन महामंडळ प्रशासन डोळेझाक करीत होते. युवासेना दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख विपुल उभारे यांच्या नेतृवाखाली २२ जुलै रोजी माणगाव बस स्थानकामधील खड्ड्यातील पाण्यात उभे राहून आंदोलन करण्यात आले होते.

त्यावेळी परिवहन महामंडळ प्रशासनाने जेसीबी लावून तात्पुरती डागडुजी केली होती. त्यानंतर १ ऑगस्ट २०२२ रोजी परिवहन महामंडळाकडून या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र निविदा मंजूर करण्यात तीन महिन्यापासून दिरंगाई चालू होती.दरम्यान, आमदार भरत गोगावले यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून माणगाव बस स्थानकाच्या कॉंक्रिटीकरणासाठी १६ लाख रुपयांचा निधी व निविदाही मंजूर करण्यात आली. बुधवारी संबंधित ठेकेदाराला या कामाची वर्कऑर्डर देण्यात आली असून हे काम नजीकच्या काळात सुरु होईल. त्यामुळे विपुल उभारेंच्या प्रयत्नाला यश मिळाले आहे. दरम्यान, या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल आमदार भरत गोगावले, राज्य परिवहन महामंडळाचे मुंबई प्रदेश कार्यकारी अभियंता विजय रेडकर, रायगड विभाग नियंत्रक अनघा बारटक्के, कनिष्ठ अभियंता कांबळे, माणगाव आगार व्यवस्थापक चेतन देवधर, तसेच आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व शिवसैनिकांचे विपुल उभारे यांनी आभार मानले आहेत.

# लोको पायलटच्या सतर्कतेमुळे माथेरान मिनीट्रेनचा अपघात टळला

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

नेरळ-माथेरान मिनी ट्रेनच्या मार्गावर अज्ञात इसमांनी रविवारी संध्याकाळी लोखंडी पोल आडवा टाकून ठेवला होता, मात्र लोको पायलटच्या सतर्कतेमुळे मिनी ट्रेनचा अपघात टळला.

तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आपल्या मार्गातील अनेक अडथळे दूर करीत नुकतीच नेरळ-माथेरान-नेरळ मिनी ट्रेन पर्यटकांच्या सेवेत रुजू झाली. त्यास पर्यटकांचा भरभरभरून प्रतिसाद मिळत आहे. आत्तापर्यंत तब्बल साडे तीन हजाराहून अधिक पर्यटकांनी मिनी ट्रेन सफरीचा लाभ घेतला असून रेल्वे प्रशासनाला साडेपाच लाखाहून अधिक महसूल मिळाला आहे.

रविवारी सायंकाळी माथेरान स्थानकातून सुटलेली मिनी ट्रेन वॉटर पाईपजवळ आली असता रुळावर कोणी अज्ञातांनी लोखंडी रॉड ठेवल्याचे लोको पायलट दिपचंद (डीसी) मीना आणि अल्प सुधांशू यांना आढळले. त्यांनी मिनी ट्रेन थांबविल्याने पुढील मोठा अनर्थ होता टळला. लोको पायलटच्या सतर्कतेमुळे मिनी ट्रेनचा अपघात टळला.

या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास रेल्वे पोलीस करीत आहेत.





# खोपोलीत कार्डियाक रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा


**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील हर्क्युलस होईस्ट्स (बजाज ग्रुप) कंपनी सीएसआरअंतर्गत हर्क्युलस होईस्ट्स चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सहजसेवा फाउंडेशनला कार्डीयाक रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. कंपनीचे प्रेसिडेंट अमित भल्ला यांच्या हस्ते बुधवारी (दि. २) सायंकाळी खोपोलीतील लोहाना समाज हॉलमध्ये या कार्डीयाक रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले.

कार्डीयाक रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध झाल्याने गरजवंताना याचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास अमित भल्ला यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सहज सेवा फाउंडेशनच्या सातत्यपूर्ण कार्याचे शुभेच्छा पत्राच्या माध्यमातून कौतुक करुन या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. उल्हासराव देशमुख व खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरिष पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी केले.

कंपनीचे व्हाइस प्रेसिडेंट विवेक महेंद्रु, सेक्रेटरी किरण मुकादम, डेप्युटी मॅनेजर निलेश खैरनार, प्रसन्न कदम, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपविभागीय अधिकारी सुषमा सोनावणे, ॲड.श्रीकांत पाटणकर, किशोर पानसरे, माधवी रिठे, जिनी सॅम्युअल, सुभाष कटकदौंड, शैलेश विठलानी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहज सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले




# श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानची दुर्गदुर्गेश्वर रायगड वारी उत्साहात



**नागोठणे : प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान आणि भक्ती शक्ती महोत्सव-आमडोशी यांच्या संयुक्त विद्यमाने ३० ऑक्टॉबर रोजी किल्ले रायगड वारीचे आयोजन करण्यात आले होते. या वारीत १० ते ४५ वर्षापर्यंतच्या तरुणांनीभाग घेतला होता. त्यांनी परिधान केलेल्या वारकरी टोपीने गडावरील पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले. त्या सर्वांना 'राष्ट्र आणि धर्मप्रेमी व्हा' ही पुस्तिका देऊन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

# स्थलांतरित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वेक्षण मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार सहा ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क आहे. त्यामुळे हंगामी स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रायगड जिल्ह्यात २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत शिक्षण विभागामार्फत सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक विभाग) पुनिता गुरव यांनी दिली.

ऊसतोड मजूर, दगडखान मजूर, वीट भट्टी कामगार, शेतमजूर, बांधकाम कामगार आदींचे व्यवसायाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. या स्थलांतरात कुटुंबियांबरोबर मुलेदेखील स्थलांतरित होत असतात. या स्थलांतरित मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जिल्ह्यात तीन ते अठरा वयोगटातील मुलांचा शोध घेण्यासाठी २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणात जिल्ह्याबाहेर स्थलांतरित होणारे विद्यार्थी तसेच इतर जिल्ह्यातून रायगडात येणारे विद्यार्थी यांची नोंद घेतली जाणार आहे.

स्थलांतरित विद्यार्थी राज्यातील कोणत्याही भागात गेले तरी त्यांना तेथील शाळेत प्रवेश मिळावा व शिक्षण पुढे सुरू राहावे, यासाठी अशा विद्यार्थ्यांना शिक्षणहमी कार्ड देण्याची तरतूद करण्यात आली असून, त्याद्वारे स्थलांतरित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राहता येणार आहे. यासाठी व्यापक स्वरूपात सर्वेक्षण मोहीम राबवून प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या सर्वेक्षण मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी केले आहे.

# पाली बसस्थानकातील स्वच्छतागृह सुरू करा

**अन्यथा आंदोलन, मनसेचा इशारा**

**पाली : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) पाली बस स्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह प्रवासी व जनतेसाठी खुले करण्यात यावे, अशी मागणी सुधागड तालुका मनसे तर्फे करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन नुकतेच पाली बस स्थानक कार्यालयाला देण्यात आले. स्थानकातील स्वच्छतागृह जलद सुरु करा, अन्यथा मनसे स्टाइलने दणका देऊ, असा इशारा या निवेदनातून देण्यात आहे.



नूतनीकरणासाठी पाली येथील एसटी स्थानकाची इमारत दीड वर्षांपूर्वी तोडण्यात आली आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून स्थानक आवारात प्रवासी शेड, कार्यालय, कर्मचारी निवारा खोली व स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. मात्र हे सार्वजनिक स्वच्छतागृह प्रवाशांसाठी खुले करण्यात आलेले नाही. परिणामी प्रवाशांची विशेषतः महिलांची मोठी गैरसोय होत आहे. तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी व भाविक येथे येतात. मात्र स्वच्छतागृहाच्या अभावी त्यांची कुचंबणा होत आहे. हे सार्वजनिक स्वच्छतागृह नागरिक तसेच प्रवाशांसाठी खुले करण्यासाठी मनसेचे पाली शहर अध्यक्ष दिपेश लहाने यांनी पाली बस स्थानक व्यवस्थापक यांच्याकडे निवेदन दिले. हे स्वच्छतागृह नागरिकांसाठी खुले केले नाही तर मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात म्हटले आहे. हे निवेदन देताना मनविसे सुधागड तालुका अध्यक्ष भावेश बेलोसे, जांभूळपाडा विभाग अध्यक्ष शेखर चव्हाण, मनसैनिक सनी यादव, सामाजिक कार्यकर्ते राकेश ठाकूर आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| **Tender No.: EE/400kV/RS(O&M)/ DN/KHR/Re-Ten-5/22-23 (RFx No. 7000025021)** | **Period for Submission of E-Bid: 04.11.2022 to 10.11.2022 up to 23:59hrs** |
|---|---|

**Name of Work:** Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus conductor Span at 400kV RS, Kharghar

| Estimated Cost (Rs.) | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| 14,30,827.87/- (Including GST) | 14308.28/- | 500/- + GST | 10.11.2022 up to 23:59 Hrs | 11.11.2022 at 10:00 Hrs (If possible) | 11.11.2022 at 10:15 Hrs (If possible) |

**Contact Persons:**
1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C. Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988

For further details, visit our website **www.mahatransco.in**
1) Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2) Eligible contractors should submit their bids well in advance instead of waiting till last date.

MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

**Note :** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFx No. | Description | Est. Cost |
|---|---|---|
| **Tend-45/22-23 7000024994** | Procurement of 0.4 & 0.2 ACSR Conductor under EHV (O&M) Circle, Panvel... **Re-Tender** | Rs. 23.26 Lakhs |
| **Tend-46/22-23 7000024932** | Work of replacement of old 220kV Circuit Breakers at 400 kV R.S. (O&M) Dn., Kharghar... **Re-Tender** | Rs.112.20 Lakhs |
| **Tend-47/22-23 7000024978** | Supply of various general asset material required at various locations under EHV (O&M) Circle, Panvel... **Re-Tender** | Rs. 3.72 Lakhs |
| **Tend-48/22-23 7000024982** | AMC of preventive maintenance, Emergency and Breakdown of various 220kV and 100kV Lines under Panvel Division ... **Re-Tender** | Rs. 30.00 Lakhs |
| **Tend-50/22-23 7000024982** | Work of AMC for providing servicing and refilling of Fire Extinguisher at various substations, under Panvel Circle.... **1st extn.** | Rs. 50 Lakhs |

**EMD:** Minimum Rs. 5000/- OR 1% of estimated cost **Tender Fee:** Rs. 500/- for each tender & Rs. 5000/- for Tend- 47/22-23 **Submission of Bids:** From 03.11.2022 to 10.11.2022 up to 23:59 Hrs **Opening Date:**11.11.2022 @ 11:00 Hrs. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006220. E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमिन मालक **श्री. यशवंत दामाजी पाटील, श्रीमती यशोदा नारायण पाटील, श्री. अंकुश नारायण पाटील, श्री. प्रकाश नारायण पाटील, श्री. गुरुनाथ नारायण पाटील, श्री. एकनाथ नारायण पाटील** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे -जांभुळपाडा, तालुका - उरण, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं. | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४ | २ | ०-२१-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२२-०० | ०.५६ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०३/११/२०२२.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. दूरध्वनी क्र. : मो. क्र. ९९३०३६९८६१



## जाहीर प्रसिध्दीकरण

लवेंडर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.कोन, ता.पनवेल, जि.रायगड या सहकारी संस्थेचा सन २०२२ ते २०२७ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम ानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.०७-११-२०२२ ते दि.१४-११-२०२२ नामनिर्देशन पत्र छानणी दि.१५-११-२०२२, नामनिर्देशन माघारी दि.१६-११-२०२२ ते दि.३०-११-२०२२ व आवश्यकतेनुसार मतदान दि.११-१२-२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजुला, पनवेल, जि.रायगड यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**(निता पुगांवकर)**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**



## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यात येत आहे की, **श्री. पंढरीनाथ नारायण कडू** यांना सिडको लि. यांच्याकडून १२.५ टक्के योजने नुसार **सिडको फाईल नं. ७२४** अंतर्गत **मौजे- उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथील भूखंड नं. बी-११९, सेक्टर नं. ८, क्षेत्र-४०० चौ.** मी. हा भूखंड वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर भूखंडाबाबत **श्री. पंढरीनाथ नारायण कडू** यांनी आमच्या अशिलांच्या लाभात विक्री करारनामा केलेला असून त्याअनुषंगाने आमच्या अशिलांनी त्यांच्या विरुध्द **पनवेल येथील मे. दिवाणी न्यायालयात स्पे, मु. नं. ४५६/२०१३** हा दावा दाखल केलेला होता. सदर दाव्याचेकामी आमचे अशिल व **श्री. पंढरीनाथ नारायण कडू** यांच्यात झालेल्या तडजोडीनुसार मे. न्यायालयाने पारित केलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता आमच्या अशिलांनी **पनवेल येथील मे. दिवाणी न्यायालयात स्पे. दरखास्त नं. ९४/२०१९** दाखल केलेली आहे. सदर दरखास्त अद्याप न्यायप्रविष्ठ आहे.

**सबब, तमाम जनतेस या नोटीसीने सावधान करण्यात येत आहे की,** वर नमुद भूखंडाबाबत **श्री. पंढरीनाथ नारायण कडू** अथवा इतर कोणत्याही इसमांबरोबर कोणत्याही स्वरुपाचा करार/मदार/ व्यवहार करु नये आणि केल्यास असा व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०२/११/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

# नवी मुंबईत 'पीएम स्वनिधी'ला गती

## प्रक्रियेबाबत पालिका आयुक्तांच्या बँकांना सूचना



**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेमध्ये नवी मुंबई महापालिकेचे काम एमएमआर क्षेत्रातील महापालिकांमध्ये सर्वोत्तम झालेले आहे. तरी १०० टक्के अर्जदारांना आत्मनिर्भर निधी उपलब्ध करून देणे हे आपले उद्दिष्ट असून त्याकरिता येणाऱ्या अडचणी दूर करून कर्ज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बँकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून पुढाकार घ्यावा, असे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सूचित केले.

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील बँकांच्या बैठकीप्रसंगी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी निधी मंजूर झाल्यानंतरही त्याचे वितरण न झालेले अर्ज, बँकेच्या पातळीवर प्रलंबित असलेले अर्ज आणि पुरेशा कागदपत्रांअभावी परत पाठविण्यात आलेले अर्ज या तीन गोष्टींबाबत सकारात्मक दृष्टीने कार्यवाही करावी, असे बँकांच्या प्रतिनिधींना निर्देशित केले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज गरड, समाजविकास विभागाचे उप आयुक्त दादासाहेब चाबुकस्वार, शिखर बँकेचे व्यवस्थापक भारती आणि इतर अधिकारी व विविध बँकांचे व्यवस्थापक आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

आत्मनिर्भर भारत

कष्ट करून कुटुंब चालविणाऱ्या पथविक्रेत्यांना मदतीचा हात मिळावा यादृष्टीने केंद्र शासनाने पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना राबविण्यास कोविड काळात सुरुवात केली. ज्यायोगे कोविड काळातील लॉकडाऊनमध्ये हातावर पोट असणाऱ्या पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात झालेल्या परिणामातून त्यांना दिलासा मिळू शकेल. या योजनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये इतके खेळते भांडवली कर्ज बँकांमार्फत उपलब्ध करून दिले जात आहे. याचा लाभ नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील ५३०४ पथविक्रेत्यांनी घेतला. त्याचप्रमाणे २०४० पथविक्रेत्यांनी पहिल्या टप्प्यातील कर्ज फेड करून दुसऱ्या टप्प्यातील २० हजार रुपये इतके खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून घेतले.

पथविक्रेत्यांना हे कर्ज उपलब्ध होण्यात कोणत्याही प्रकारची अडचण भासू नये याकरिता महापालिकेच्या समाजविकास विभागाच्या वतीने नियोजन करण्यात आले. बँकांशी समन्वय साधून पथविक्रेत्यांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत याकरिता विभागनिहाय समन्वयक नेमण्यात आले. विविध ठिकाणी शिबिरे आयोजित करून पथविक्रेत्यांना अर्ज भरताना कोणत्याही अडचणी येणार नाहीत याची विशेष काळजी घेण्यात आली. यामुळे नवी मुंबई महापालिकेचे कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतचे काम एमएमआर क्षेत्रातील महापालिकांमध्ये सर्वोत्तम आहे.

उर्वरित अर्जदारांना तसेच ज्यांचे अर्ज विविध कारणांनी प्रलंबित आहेत अथवा परत पाठविण्यात आलेले आहेत अशा सर्व अर्जदारांना आवश्यक त्रुटींची पूर्तता करून पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी गतीमान कार्यवाही करावी, अशा सूचना महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विविध बँकांच्या प्रतिनिधींना या बैठकीत केल्या.

# पालेभाज्यांचे दर चढेच!



**किरकोळ बाजारातील दर (जुडीसाठी)**

- कोथिंबीर – ७० ते ८० रुपये
- मेथी – ५० रुपये
- पालक – ४० रुपये
- कांदा पात – ३० ते ४० रुपये
- शेपू – ३० ते ४० रुपये

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसामुळे कृषीमालाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे फळभाज्यांची आवक रोडावल्याने बाजारात भाज्यांचे दर किलोसाठी १५० ते २०० रुपयांवर गेले आहेत. अशातच पालेभाज्यांच्या किमतीदेखील वधारल्याने आर्थिक ताळमेळ बसवताना गृहिणींना मोठी कसरत करावी लागत आहे.

फळभाज्या महागल्याने अनेकांनी सध्या पालेभाज्यांकडे मोर्चा वळवला आहे; मात्र बाजारात पालेभाज्यांची आवकही निम्म्यावर आली आहे. मागणी आणि पुरवठा यांचा ताळमेळ बसत नसल्याने पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. अशातच आता थंडी आणि मध्येच कडक ऊन अशी परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे भाज्या शेतातच करपू लागल्याची स्थिती आहे. त्यामुळे आवक घटली असून दरांमध्ये वाढ होत आहे. घाऊक बाजारात एरवी कोथिंबीर, मेथीच्या जुडीसाठी १० रुपये मोजावे लागत होते, मात्र आता कोथिंबीरची एक जुडी ५० ते ७० रुपयांना तर मेथीची एक जुडी २५ ते ३० रुपयांना विकली जात आहे. याशिवाय कांद्याची पात १४ ते १८, पालक २५ ते ३०, शेपू १५ ते २०, मुळा भाजी २० ते २५ रुपयांवर गेल्याने पालेभाज्या कशा खरेदी करायच्या, असा प्रश्न महिलांना पडत आहे.

**फळभाज्यांपाठोपाठ पालेभाज्यांचे दरही वाढलेले आहेत. त्यामुळे भाज्या खरेदी करायच्या की नाही, असा प्रश्न पडला आहे; मात्र महागाईचा परिणाम आता सर्वच ठिकाणी होत असल्याने दुसरा पर्यायदेखील दिसत नाही.**

**–पूजा जाधव, गृहिणी**

# आरिवलीत बिबट्याचा वावर

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**पनवेल : वार्ताहर**

आरिवली आणि आष्टे गावामध्ये ग्रामस्थांना बिबट्या दिसला आहे. याबाबत वनविभागाचे अधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन पाहणी केली. बिबट्याच्या दर्शनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पनवेल तालुक्यात जंगलमय भाग आहे. त्यामुळे जंगलातून एखादा बिबट्या शिकारीच्या नादात गावांमध्ये येऊ शकतो. आरिवली आणि आष्ट्ये गावामध्ये असलेल्या तलावाजवळ नागरिकांना बिबट्या दिसून आला.याची माहिती वनविभागाला देण्यात आली. गेल्या चार दिवसांपासून बिबट्या दिसत असल्याचे नागरिकांनी सांगितले. वनविभागाने याबाबत स्थळ पाहणी केली आहे व ग्रामपंचायतींना पत्र लिहून नागरिकांना सतर्क करण्याचे आवाहन केले असल्याचे सांगितले. तसेच बॅनर छापून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे, असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांटची महापालिका आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या अमृत योजनेंतर्गत कोपरखैरणे येथे उभारण्यात आलेल्या टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टच्या कार्यप्रणालीची बुधवारी (दि. २) आयुक्त राजेश नार्वेकर यांनी बारकाईने पाहणी केली व तेथील पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा पूर्णत: वापर होण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाहीचे निर्देश दिले.

सद्यस्थितीत या टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टमधून निर्माण होणारे सहा लक्ष लिटर पुनर्प्रक्रियाकृत पाणी तुर्भे एमआयडीसीतील सहा उद्योगसमुहांना प्रायोगिक स्वरुपात पुरविले जात असून उर्वरित पुनर्प्रक्रियाकृत पाणी अधिक उद्योगसमुहांना देण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधून तत्पर कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त राजेश नार्वेकर यांनी अभियांत्रिकी विभागाला दिले.

अमृत योजनेंतर्गत उभ्या राहिलेल्या या टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टचा ५० टक्के खर्च केंद्र व राज्य शासनामार्फत उपलब्ध होत असून कोपरखैरणे प्रमाणेच ऐरोली येथेही प्रतिदिन २० द.ल.लि. टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांट उभारण्यात आलेला आहे. महापालिकेची शहरात सात ठिकाणी सी-टेक या अत्याधुनिक तंत्रप्रणालीवर आधारित मलप्रक्रिया केंद्रे असून त्यामधील प्रक्रियाकृत पाणी उद्याने, दुभाजकांमधील वृक्षराजी, चौकांमधील कारंजी अशा विविध गोष्टींसाठी वापरले जात आहे. या मलप्रक्रिया केंद्रातील सेकंडरी ट्रिटमेंट होऊन बाहेर पडणाऱ्या प्रक्रियाकृत सांडपाण्यावर अल्ट्रा फिल्टरेशन व अल्ट्रा व्हायलेट या प्रगत तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करून टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्टमध्ये उद्योगसमुहांना उपयोगात आणता येईल अशा मानकाचे पुनर्प्रक्रियाकृत पाणी तयार केले जात आहे. अशा प्रकारचे प्रत्येकी २० द.ल.लि. क्षमतेचे दोन टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट कोपरखैरणे व ऐरोली येथे उभारण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे उद्योगसमुहांना हे पुनर्प्रक्रियाकृत सांडपाणी पुरविण्यासाठी महापे, तुर्भे व निब्बान टेकडी रबाळे येथे उच्चस्तरीय जलकुंभ उभारण्यात आले आहेत. या जलकुंभांतील पाणीपातळीची माहिती टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांटमधील नियंत्रण कक्षात ऑनलाइन लाईव्ह दिसावी यादृष्टीने कार्यप्रणाली विकसित करण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या.

या वेळी शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, कार्यकारी अभियंता अजय संख्ये व विजय राऊत, कोपरखैरणे विभाग अधिकारी प्रशांत गावडे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**नवी मुंबई महानगरपालिका राबवित असलेले प्रकल्प, उपक्रम हे नाविन्यपूर्ण असतात ही आपल्या शहराची ओळख आहे. त्यामुळे ही ओळख अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येक बाबतीत कल्पकतेचा वापर व्हावा व यामधून शहराचा नावलौकीक वाढविण्यासाठी प्रयत्न केला जावा.**

**–राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# कोपरखैरणेत वाहनांचे अतिक्रमण

## कारवाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई शहरात विशेषत: कोपरखैरणे विभागात पार्किंगची समस्या जटील होत आहे. सिडको वसाहतीत तोकडे रस्ते, रेल्वे स्थानक वगळता एकही असे सुसज्ज वाहनतळ नाही. त्यामुळे कोपरखैरणेत पार्किंगचा पुरता बोजवारा उडत आहे. कोपरखैरणे सेक्टर आठ येथील विभागात महापालिकेचे खेळासाठी असलेले मैदान आता वाहनतळ बनत चालले आहेत. मोकळ्या मैदानावर वाहनांनी कब्जा घेतला आहे. शालेय विद्यार्थ्यांना सुटीच्या कालावधीत तर इतर मुलांनी खेळण्यास जायचे कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कोपरखैरणे सेक्टर पाच ते सेक्चर आठ येथील मैदानात राजरोसपणे वाहन पार्क केली जात आहेत. याठिकाणी मुलांना मैदानी खेळ खेळण्यासाठी हे भूखंड उपलब्ध करून दिले आहेत. मात्र या मैदानाचा मुलांना उपयोगच होत नाही. कोरोनादरम्यान घरातच मनोरंजन करणाऱ्या बच्चे कंपनी आता मैदानी खेळाकडे वळत आहेत, मात्र त्यांना हक्काचे मिळालेले मैदानात ही वाहनांचा गराडा असल्याने मैदानी खेळ खेळता येत नाहीत. काहीवेळा तर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांना अडचणी येतात. काही वेळा मैदानात पार्क केलेले वाहनचालक मुलांना गाडी काही झाले तर असे बोलून दमदाटी करत असतात. यामुळे कित्येकदा येथे भांडणाचे प्रकारसुद्धा घडत आहेत.

कोपरखैरणे से.१ ते ४ या ठिकाणच्या मैदानात ही असेच वाहनांचे अनधिकृत पार्किंग केले जात होते, मात्र त्याठिकाणी आता मैदानात केवळ नागरिकच जाऊ शकतील अशी पायऱ्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तेव्हा इतर मैदानातही अशी व्यवस्था व्हावी, अशी मागणी होत आहे. कोपरखैरणे विभागात प्रत्येक एकूण चार सेक्टरसाठी एक सामायिक उद्यान आणि क्रीडांगण उपलब्ध आहे, मात्र या विभागातील मैदानांवर मैदानी खेळापेक्षा वाहनांची संख्या जास्त दिसते. दिवसेंदिवस याकडे दुर्लक्ष होत असल्याने वाहनतळाचे स्वरूप येत आहे. त्यामुळे येथील मुले मैदानी खेळापासून वंचित राहत आहेत. या अतिक्रमणावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# रक्तस्त्रावामुळे व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल :** ट्रॅक्टर चालवताना रोटरमध्ये पाय अडकून झालेल्या रक्तस्त्रावात एका ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

धोदानी येथील कमळ्या हिरू घुटे हे पिंपळवाडी येथील सेरेनेटी फार्म हाऊसमध्ये छोटा ट्रॅक्टर चालवत होते. या वेळी टर्न मारताना रोटरमध्ये त्यांचा पाय अडकला. यात कमळ्या जखमी झाले व मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. त्यांना पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथे त्यांचा मृत्यू झाला.

# रायगडकरांचा प्रवास होणार सुखकर

**उरण : वार्ताहर**

मुंबईकरांसह रायगड पुणे जिल्ह्यातील प्रवाशांना नवी मुंबई मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर लवकरच पोहचता यावे यासाठी चिरले येथे हा रस्ता विमानतळासह मुंबई पुणे महामार्गासह मुंबई-गोवा मार्गास महामार्गास जोडण्यासाठी २६ ४९ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत, तर दुसरीकडे सायन-पनवेल महामार्गावर वाशी येथे सातशे कोटींच्या तिसऱ्या खाडीपुलाच्या कामाने ही वेग घेतला आहे.

याशिवाय विरार अलिबाग मल्टी मॉडल कॅरिडोर व धर्म तर खाडीवरील रेवस-करंजा पुलांमुळे रायगडकरांचे उड्डाण सुखकर होणार आहे.

नवी मुंबई महामार्ग जोडणार असल्यामुळे या तीनही जिल्ह्यांतील प्रवाशांचा प्रवास सोयीचा होणार आहे. एमएमआरडीएल आधीच न्हावाशेवा ते शिवडी या सिलिंकचे काम वेगाने सुरू केले आहे, शिवाय कोकणचा पश्चिम उपनगरांना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळा जोडणाऱ्या विरार अलिबाग माहिती मोडेल कॉरिडोर पहिल्या टप्प्यातील बांधकामाचे निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. कल्याण, नवी मुंबई ठाणे मीरा-भाईंदर विरार कल्याण हा परिसर जलवाहतूक विमानतळापर्यंत जोडण्यात येणार आहे.

# पाणजे येथील पारंपरिक मत्स्य शेतकऱ्यांकडून प्रशासनाचे आभार




**उरण : प्रतिनिधी**

मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, पाणजे च्या मत्स्य शेतकर्यांनी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांची उरण तहसिलदारांच्या दालनात भेट घेतली. शासनाच्या विवीध योजना पारंपरीक मत्स्य शेतकऱ्यांना मिळाव्या यासाठी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत त्यांचे आभार मानले.

उरण तालुक्यात होत असलेल्या विकास कामांमूळे व आलेल्या विवीध प्रकल्पांमूळे स्थानिक पारंपारीक मत्स्य शेतकरी देशोधडीला लागला आहे. त्यांचा परंपरागत व्यवसायावर गधा आली आहे. त्या संदर्भात उरण मधील पाणजे येथील पारंपारीक मत्स्य शेतकऱ्यांनी शासनाकडून नुकसानभरपाई मिळण्यासंदर्भात त्यांनी उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांची काही दिवसापूर्वी भेट घेतली होती. त्यावेळी भाऊसाहेब अंधारे यांनी त्यांना शासनाच्या विवीध योजना मिळण्यासाठी मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, तयार करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले होते.

या शेतकऱ्यांनी तहसिलदारांच्या मार्गदर्शनानुसार मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था. मर्या, पाणजेची स्थापना केली. त्या संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्र आल्यावर सर्व मत्स्य शेतकऱ्यांनी तहसीलदार साहेबांची भेट घेवून आभार व्यक्त केले. या वेळी मळगंगा मत्स्य शेतकरी उत्पादक सहकारी संस्था मर्या. पाणजेचे चेरमन विजय पाटील, सेक्रेटरी अविनाश पाटील, सदस्य लखपती पाटील सदस्य स्वाती पाटील, कविता पाटील, उमेश पाटील इत्यादी उपस्थित होते.

# उरणची अपहृत मुलगी आई-वडिलांकडे सुपूर्द

## पोलिसांकडून आरोपीचा सहा दिवसांत शोध

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण येथील पागोटे गावातील एका १२ वर्षीय अल्पवयीन मुलीचे २६ ऑक्टोबर रोजी बिहारचा तरुण जितेंद्र उर्फ जितू याने जबरदस्तीने पळवून अपहरण केल्याची तक्रार उरण पोलिसांत दाखल करण्यात आली होती. आरोपीच्या मोबाइलचा तपास करीत उरण ते बेंगलोर, तमिळनाडू चेन्नई, आणि नागपूर असे रस्ते मार्गाने दोन हजार ७१३ किलोमीटरचे अंतर पार करून आरोपीसह मुलीला शोधून तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात सहा दिवसांत सुखरूप सुपूर्द केले.

या गुन्ह्यातील अल्पवयीन मुलीची तत्काळ सुटका करण्यासाठी परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त पोर्ट विभागाचे सहाय्यक आयुक्त, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक विशाल राजवाडे, हवालदार उदय भगत, रतन राठोड असे पोलीस पथक तयार करण्यात आले होते. या पथकाने आरोपीकडे असलेल्या मोबाइल वरून लोकेशन ट्रॅक करण्यात आले. बंगळुरू, तामिळनाडू, चेन्नई त्यानंतर नागपूर येथे तपास पथ पोहचले. आरोपीचे लोकेशन नागपूरच्या दिशेने प्रवास करताना दिसून आले. लोकेशन राप्ती सागर १२५२२ ट्रेनमधून पुढे जात असल्याचे तांत्रिक तपासावरून निष्पन्न करून नागपूर जीआरपी मुख्य नियंत्रण कक्षाला माहिती देण्यात आली. गाडी अमला जंक्शन येथे थांबवून आरोपीचा शोध घेऊन ताबा घेण्यात आला.

पोलीस पथक चेन्नई रेल्वे स्थानक येथून १२८७ किमी खासगी वाहनाने आमला रेल्वे स्टेशन येथे पोहचून त्यांनी आरोपीचा व पीडित मुलीचा ताबा घेतला असून हा गुन्हा उघडकीस आणला असल्याची माहिती वरिष्ठ निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली.

# मॉरिशेसमधील मराठी कलावंत महाराष्ट्र दौऱ्यावर

## आनंदवारी नृत्याविष्कारातून कला करणार सादर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मॉरिशेस येथिल मराठी कलावंत आपला 'आनंदवारी नृत्याविष्कार' कार्यक्रम घेऊन, महाराष्ट्राच्या दोन दिवसीय दौऱ्यावर येत आहेत. नवी मुंबईतील वाशी आणि पनवेल येथे त्यांच्या 'नृत्याविष्काराचे कार्यक्रम होणार असल्याचे मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मोहन भोईर यांनी सांगितले.

पमॉरिशेस दूरदर्शनचे अधिकारी अर्जुन पुतला यांच्या मार्गदर्शनाखाली मॉरिशेस येथील मराठी कलावंत ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी दोन दिवसांच्या दौऱ्यावर महाराष्ट्रात येत आहे. मॉरिशेच मराठी मंडळ, प्रतिक थिएर्टर व मराठी साहित्य मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता तर ८ नोव्हेंबर रोजी वाशी येथिल विष्णूदास भावे नाट्यगृह संध्याकाळी ६.३० वाजता मॉरिशेस येथील मराठी कलावंत आनंदवारी नृत्याविष्कार कार्यक्रम सादर करणार आहेत. प्रतिक थिएट्र्सचे मोहन भोईर यांनी वाशी येथील कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यासाठी त्यांना प्रकाश कुलकर्णी, प्रा. चंद्रकांत मढवी, पुंडलिक मात्रे आणि ॲड. मनोज म्हात्रे यांनी सहकार्य केले आहे. मॉरिशेस येथिल आपले मराठी कलावंत सादर करीत असलेल्या 'आनंदवारी नृत्याविष्कार' उपस्थिती लावून, त्यांचा उत्साह वाढविण्याचे आवाहन मोहन भोईर यांनी केले आहे.



**वाचाल तर वाचाल!**

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, ६ नोव्हेंबर २०२२ रोजी वाचूया माणगाव (रायगड) येथील कवयित्री सायराबानू वजीर चौगुले यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

# आजपासून साजगावची यात्रा

## खोपोली पालिका प्रशासक अनुप दुरे यांनी केली पाहणी






**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पवित्र असलेल्या खोपोली नगरपालिका हद्दीतील ताकई येथील विठ्ठल मंदिर परिसरात कार्तिकी एकादशीपासून भरणाऱ्या साजगावच्या बोंबल्या विठोबा यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा आहे. यावर्षी शुक्रवार (दि. ४) पासून पुढील पंधरा दिवस हा यात्रा महोत्सव संपन्न होणार असून, त्याची तयारी पूर्ण झाली आहे.

बोंबल्या विठोबा यात्रेला रायगड जिल्ह्यासह नवी मुंबई, ठाणे, पुणे जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने येतात. घरगुती वापरासाठी लागणारे सर्व साहित्य, मिठाईची दुकाने, उबदार कपडे, खेळण्यांसह, बैल बाजार व सुक्या मासळीचा बाजार हे साजगाव यात्रेचे मुख्य आकर्षण आहे. लम्पी स्कीन रोगामुळे यावर्षी बैल बाजार असणार की, नाही याबाबत अद्याप प्रशासनाने भूमिका स्पष्ट केलेली नाही.

सर्व दुकाने थाटली असून अन्य तयारी ही जोरदार सुरू आहे. सलग पंधरा दिवस चालणाऱ्या या यात्रेत करोडो रुपयाची उलाढाल होते. यात्रा परिसरात अग्नीसुरक्षा, मंडप, पाणी व वीजपुरवठा, परिवहन, वाहनतळ आदी सेवा पुरविण्यासाठीची जबाबदारी खोपोली नगर परिषदेकडे आहे. त्यानुसार नगर परिषद प्रशासनाकडून सर्व नियोजन व तयारी करण्यात आली आहे. खोपोली पोलीस प्रशासनही यात्रादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तत्पर आहे. खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या पुढाकाराने साजगाव मंदिर देवस्थान कमिटीचा वाद संपुष्टात आला असल्याने यात्रा मोठ्या उत्साहात होणार आहे.

दरम्यान, खोपोली नगर परिषदेचे प्रशासक अनुप दुरे यांनी साजगाव यात्रा परिसराची पाहणी केली. अग्निशमन दलास अडथळा होईल, अशा गाळेधारकांना त्यांनी गाळे मागे घेण्यास लावले.

रायगड जिल्हा पोलीस दलाच्या श्वानपथकानेही यात्रेची जागा पिंजून काढली. साजगाव यात्रा निर्विघ्न होण्यासाठी प्रशासक अनूप दुरे यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली नगर परिषद अधिकारी सचिन सोनावणे, तानाजी लखिमले, हेमराज चव्हाण, अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे, शेखर मसिदा व कर्मचारी १५ दिवस अहोरात्र मेहनत घेणार आहेत.

“

**साजगाव यात्रेची सुरक्षा महत्त्वाची आहे. मंदिर व्यवस्थापन समिती, यात्रा कमिटी, पोलीस प्रशासन यांच्या सहकार्याने ही यात्रा निर्विघ्नपणे संपन्न व्हावी यासाठी खोपोली नगर परिषद प्रशासन कटिबद्ध आहे. यात्रेकरूंनीही सहकार्य करावे.**

**–अनुप दुरे-पाटील,**
**प्रशासक, खोपोली नगर परिषद**

# विश्वकर्मा समाजाचे मुंबईत होणार महासंमेलन

**रोहे : प्रतिनिधी**

रोजगार व व्यवसाय निमित्ताने विश्वकर्मा समाज मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात आला आहे. या विश्वकर्मा समाजाचे महासंमेलन १३ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या संमेलनाच्या पूर्व नियोजनासाठी विश्वकर्मा महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र विश्वकर्मा यांनी नुकताच रोहा येथे येऊन समाज बांधवांशी चर्चा केली असल्याची माहिती रोहा विश्वकर्मा समाजाचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार विश्वकर्मा यांनी दिली.

समाज बांधवांना जातीचे दाखले व अन्य सुविधा मिळाव्यात, आदी मागण्या मुंबईत होणाऱ्या महासंमेलनात करण्यात येणार आहेत. महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्र विश्वकर्मा यांनी रोह्यातील समाज बांधवांकडून त्यांच्या अडीअडचणी, समस्या जाणून घेतल्या व त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. या वेळी उत्तर भारतीय महासंघ अध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, विश्वकर्मा समाजिक सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार केशव विश्वकर्मा, पूजा कमेटी अध्यक्ष बाबुलाल वर्मा, उपाध्यक्ष बृजलाल विश्वकर्मा, सचिव मुनेश्वर वर्मा, खजिनदार संतोष विश्वकर्मा, वरिष्ठ सल्लागार हरिश्चंद्र विश्वकर्मा, कार्यकारिणी सदस्य बसंत विश्वकर्मा, हरीश विश्वकर्मा, भीम विश्वकर्मा, नागेन्द्र विश्वकर्मा, राजू विश्वकर्मा, संतोष विश्वकर्मा, सुनिल विश्वकर्मा, धिरज विश्वकर्मा, कृष्ण विश्वकर्मा, संतराम प्रजापती, शिवकुमार लोधी, धनंजय सिंह, सुभाष साहनी उपस्थित होते.

# नागोठण्यात सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**नागोठणे : प्रतिनिधी**




कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन पाळण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेसाठी कटीबद्ध राहाण्याची शपथ देण्यात आली.

या निमित्ताने एकता दैडचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर आधारित मार्गदर्शन केले. भारताची एकता व अखंडता अबाधित राखण्यासाठी युवकांनी दिलेली राष्ट्रीय एकतेची शपथ अंगीकारावी, असे आवाहन डॉ. गुरव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास शिंदे, दीपक दाभाडे, रवींद्र जोशी यांनी विशेष मेहनत घेतली.

# गांधे, वरवठणे आदिवासीवाडीवर दिवाळी फराळाचे वाटप

**नागोठणे : प्रतिनिधी**



शांताबाई नारायणराव शेळके चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे शिहू गावातील डॉ. रोहिदास नारायण शेलके यांच्या वतीने ‘एक चकली सुखाची, भेटवस्तू आनंदाची’ या उपक्रमांतर्गत गांधे आणि वरवठणे आदिवासीवाडी येथे दिवाळीनिमित्त साडी आणि फराळाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास नागोठणे पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजन जगताप, वरवठणे ग्रामपंचायत सरपंच ऋतुजा म्हात्रे, उपसरपंच विजय पाटील, के. के. कुथे, सचिन निकम, विनोद पाटील, गणपत म्हात्रे, रेवती पाटील, पुष्पा म्हात्रे, बाबाजी पवार, नारायण म्हात्रे, तसेच गांधे आदिवासी वाडीवरील कार्यक्रमासाठी वेलशेत दूरक्षेत्रचे इंचार्ज प्रमोद कदम, नितीन गायकवाड, देवेंद्र भोईर, जनार्दन नारायण शेळके, चंद्रकांत म्हात्रे, जनार्दन वामन शेळके, नीलिमा म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय पाटील यांनी केले.

# खोपोलीत किल्ले स्पर्धेला प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**



खोपोली रोटरी क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या किल्ले स्पर्धेला बच्चे कंपनीने चांगला प्रतिसाद दिला. स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते.

या स्पर्धेत वर्धमाननगर येथील किल्ल्याला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. स्वामी समर्थनगर आणि वरची खोपोली येथील ओंकार नितीन भावे मित्र मंडळाला संयुक्तपणे द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, तृतीय क्रमांक रम्यनगरी-विणानगर व दत्त कृपा सोसायटी यांना विभागून देण्यात आला आहे. प्रथम तीन क्रमांक विजेत्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी खोपोली रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेंद्र जोशी, सेक्रेटरी मिलिंद बोधनकर व माजी अध्यक्ष संजय पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

# निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे –रमेश इंगळे

**अलिबाग : जिमाका**

शासनाच्या ज्या निवृत्तीवेतनधारकांना रायगड जिल्हा कोषागाराकडून निवृत्तीवेतन प्रदान केले जाते, अशा सर्व निवृत्तीवेतनधारकांनी हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र १ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सादर करावेत, असे आवाहन रायगड जिल्हा कोषागार अधिकारी रमेश इंगळे यांनी केले आहे.

निवृत्तीवेतनधारकाचे हयात प्रमाणपत्र विहित मुदतीत कोषागारात प्राप्त झाल्याशिवाय पुढील निवृत्तीवेतन प्रदान केले जाऊ शकत नाही. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांनी कोषागार कार्यालयाकडून संबंधित बँकेकडे पाठविण्यात आलेल्या घोषणापत्रावर स्वतः हयात असल्याबाबत बँक व्यवस्थापक यांच्या समक्ष स्वाक्षरी करावी. ही घोषणापत्रे संबंधित बँकांकडे पाठविण्यात आलेली आहेत. पुनर्नियुक्त/ पुनर्विवाह केलेल्या कुटुंब निवृत्तीवेतन/ निवृत्तीवेतनधारकांकरिता नियमित नमुना वापरावा. मनिऑर्डरद्वारे निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांचे हयात दाखल्यांचे नमुने या कोषागार कार्यालयाकडून संबंधितांच्या पत्त्यावर पाठविण्यात आलेले आहेत.

त्यांनी स्वत:चे हयात दाखले स्वाक्षरीसह पूर्ण करुन कोषागार कार्यालयाकडे परस्पर पाठविण्याची व्यवस्था करावी. अधिक माहितीकरिता रायगड जिल्हा कोषागार कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी इंगळे यांनी केले आहे.

# महाडमधील कारखान्यातून तांब्याच्या पट्ट्यांची चोरी

**महाड : प्रतिनिधी**

महाड ओद्योगिक क्षेत्रातील मल्लक स्पेशालिटी कारखान्यातून सुमारे ५० हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या सहा पट्ट्या दोन अज्ञात महिलांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

महाड आयद्योगिक क्षेत्रातील सवाणे गावाच्या हद्दीत मल्लक स्पेशालिटी प्रायव्हेट लिमिटेड (प्लॉट नं. सी-१०३) कारखाना आहे. या कारखान्यातील अनिल प्रेमानंद वाघ यांनी बुधवारी (दि. २) महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, २ ऑक्टोबर संध्याकाळी ७.३० ते १४ ऑक्टोबर सकाळी ७.४५ या कालावधीत कारखान्यातील ५० किलो वजनाच्या सुमारे ५० हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या सहा पट्ट्या ४०ते ४५ वयोगटातील दोन अज्ञात महिलांनी चोरून नेल्या. ही बाब चौकशी आणि सीसीटीव्हीमुळे उघड झाली. त्यामुळे तब्बल एक महिन्याने कंपनी व्यवस्थापनाकडून या प्रकरणी अज्ञात महिलांच्या विरोधात भा. दं. वि. कलम ३७९/३४प्रमाणे औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मनाला सजवण्यासाठी चांगले विचार करा –प्रल्हाद पै

## जीवनविद्या मिशनचा वैजनाथ येथे आनंद मेळावा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**



मनाला चांगले विचार देण्यासाठी शुभचिंतन आणि इष्टचिंतन करणे आवश्यक आहे. योग्य प्रयत्न आणि शुभचिंतन केले तर नवनवीन संधी चालून येतात, असे प्रतिपादन जीवनविद्या मिशनचे आजीव विश्वस्त प्रल्हाद वामनराव पै यांनी बुधवारी (दि. २) वैजनाथ येथे केले.

सद्गुरू वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथील जीवनविद्या मिशनच्या सद्गुरू सहवासमध्ये आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या पाचव्या दिवशी बुधवारी झालेल्या कार्यक्रमात प्रल्हाद पै उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. मनाला सजवण्यासाठी सतत चांगले विचार करा, असा सल्ला त्यांनी या वेळी दिला.

प्रल्हाद पै पुढे म्हणाले, ’एखाद्या समस्येवर तोडगा काढायचा असेल तर आधी ती समस्या समजून घ्या, त्यावर चर्चा करा आणि समस्येवर समाधान शोधा. एखादी समस्या सोडवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे विश्वप्रार्थना म्हणा. त्यामुळे तुमच्या सकारात्मक वातावरण निर्माण होतो आणि अनेक सम्यस्या आपोआप कमी होतात. जीवनात प्रगती करायची असेल तर मनाचं शुद्धीकरण व्हायला हवं. त्यासाठी विचार करताना सतत सावध राहायला हवे, हे त्यांनी उदाहरणासह पटवून दिले. पहिल्या सत्रात ज्येष्ठ नामधारिका डॉ. प्रभा मोदी आणि वंदना बेल्हे यांचा जीवनविद्येचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. सांगलीचे प्रख्यात नेत्रशल्य विशारद आणि जीवनविद्या मिशनचे माजी विश्वस्त डॉ. प्रदीप पटवर्धन यांनी, खरा आनंद इतरांना कसे वाटायचा हे पटवून दिले. जीवनविद्या तत्त्वज्ञान का आवडते, याबाबत नाशिकच्या उद्योजक जयश्री राजेगावकर यांनी आपले मत मांडले.

पनवेलच्या माजी नगरसेविका लीना गरड, पोलीस निरिक्षक सूर्यकांत शिंदे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भास्कर दिसले, कर्जत तालुका पंचायत समितीच्या माजी सदस्या सुरेखा हरपुडे, नायब तहसीलदार सचीन राऊत, सरपंच दीपक कारले, स्नेहल सुरज, प्रमोद बारशी, मनसेचे कर्जत तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर यांच्यासह जीवनविद्या मिशन व फाउंडेशनचे विश्वस्त दीपक काळे, पंकज नाईक, बन्सीधर राणे, श्रीराम मुल्लेमवार, स्वप्नील पराडकर, संतोष सावंत आदींसह असंख्य नामधारक उपस्थित होते.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फी सवलतीमधील अडचणी दूर करा

## बहुजन विद्यार्थी संघटनेने घातले शिक्षण संचालकांना साकडे

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या बहुतेक सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून शैक्षणिक सवलती दिल्या जातात. मात्र काही शैक्षणिक संस्थांकडून त्या सवलती देण्याबाबत अनेक अडचणी निर्माण केल्या जातात. शासनाने हस्तक्षेप करून या अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेने राज्याच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बहुजन विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींनी राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ यांची भेट घेवून, विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत आणि काही संस्था विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आणून दिले. डॉ. वाघ यांना भेटीसाठी गेलेल्या शिष्टमंडळात संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी, कर्जत तालुका अध्यक्ष सुजल गायकवाड, उपाध्यक्ष मारुती देवघरे, सरचिटणीस ऋत्विज आपटे, शहराध्यक्ष धर्मेश परमार, बळीराम ऐनकर, नेरळ शहराध्यक्ष तबरेज खान, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा जाधव, संघटनेचे कार्यकर्ते फरहान नझे यांचा समावेश होता.

बहुजन विद्यार्थी संघटनेच्या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन डॉ. वाघ यांनी या वेळी दिले.



# पाकिस्तानची द. आफ्रिकेवर मात

## उपांत्य फेरीतील आव्हान अजूनही कायम

**सिडनी : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत गुरुवारी (दि. ३) पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना झाला. उपांत्य फेरीच्या दृष्टीने पाकिस्तानसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात पाकने आफ्रिकेचा डकवर्थ लुईस नियमानुसार ३३ धावांनी पराभव केला. पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करताना २० षटकात १८५ धावा केल्या होत्या. या सामन्यातसुद्धा पावसाने खोडा घातला. याचा पावसाने आफ्रिकेचा घात केला.



धावांचा पाठलाग करताना आफ्रिकेची सुरुवात खराब झाली. शाहिन आफ्रिदीने त्याच्या पहिल्या दोन षटकांत आफ्रिकेला जबरदस्त धक्के दिले. टेम्बा बवुमा व एडन मार्कराम यांनी डाव सावरला, पण पावसाने आफ्रिकेचा खेळ बिघडवला. बराच वेळ वाया गेल्यानंतर १४ षटकांत १४२ धावांचे सुधारित लक्ष्य आफ्रिकेला दिले गेले आणि पाकिस्तानने इथेच संधी साधली.

क्विंटन डी कॉक व रिली रोसोवू हे दोन्ही फलंदाज लवकर बाद झाले. डी कॉकला तर भोपळाही फोडता आला नाही. रिलीने ७ धावा केल्या. या दोघांना आफ्रिदीने माघारी पाठवल्यानंतर शादाब खानने आफ्रिकेला मोठे धक्के दिले. टेम्बा बवुमाने १९ चेंडूंत ४ चौकार व १ षटकारांसह ३६ धावा केल्या आणि २० धावा करणाऱ्या एडन मार्कराम यांना शादाबने माघारी पाठवल्याने आफ्रिकेची अवस्था ९ षटकांत ४ बाद ६९ अशी झाली. त्यानंतर पावसाने एन्ट्री घेतली आणि डकवर्थ लुईस नियमानुसार आफ्रिका १६ धावांनी पिछाडीवर होता. पाऊस थांबल्यानंतर आफ्रिकेसमोर १४ षटकांत १४२ धावांचे सुधारित लक्ष्य ठेवले गेले आणि त्यानुसार त्यांना ३० चेंडूंत ७३ धावा करायच्या होत्या.

क्लासेन व त्रिस्तान यांनी संघर्ष करण्याचा प्रयत्न केला, पण आफ्रिदीने १५ धावांवर क्लासेनला माघारी पाठवले. मोहम्मद वासीमने १२व्या षटकात आफ्रिकेला धक्का दिला आणि त्यांना १२ चेंडूंत ४३ धावा करायच्या होत्या. नसीम शाहने १३व्या षटकात विकेट घेऊन आफ्रिकेचा पराभव निश्चित केला. ६ चेंडूंत ४१ धावांचे लक्ष्य आफ्रिकेलाही पेलवणारे नव्हते. हॅरीस रौफने १४व्या षटकात २ विकेट्स घेतल्या.

तत्पूर्वी पाकिस्तानच्या फलंदाजांनीदेखील खराब सुरुवात केली होती, मात्र शादाब आणि इफ्तिकार यांनी अर्धशतके करत संघाला १८५ धावांपर्यंत पोहचवले. शादाबने २२ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ५२ धावांची वादळी खेळी केली. इफ्तिखारने ३५ चेंडूंत ३ चौकार व २ षटकारांसह ५१ धावा कुटल्या. या विजयामुळे पाकिस्तानचे उपांत्य फेरीत प्रवेश करण्याचे आव्हान कायम राहिले आहे.

# ...म्हणून शमीऐवजी अर्शदीपला दिले शेवटचे षटक; रोहितचा खुलासा

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेशदरम्यान झालेल्या सुपर-१२ फेरीमधील दुसऱ्या गटातील सामन्यात भारताने पाच धावांनी विजय मिळवला. पहिल्या सात षटकांमध्ये शून्य बाद ६६वरून भारताने हा सामना जिंकल्याबद्दल गोलंदाजांचे कौतुक केले जात आहे. अशातच कर्णधार रोहित शर्माने सामन्यानंतर गोलंदाजीबद्दल भाष्य करताना मोहम्मद शमीचे एक षटक बाकी असतानाही अखेरचे महत्त्वपूर्ण षटक टाकण्याची जबाबदारी अर्शदीप सिंगला का दिली याबद्दल माहिती दिली.



प्रथम फलंदाजी करताना भारताचा सालामीवर के. एल. राहुलने केलेले दमदार अर्धशतके आणि विराट कोहलीच्या नाबाद ६४ धावांच्या जोरावर भारताने १८४ धावांपर्यंत मजल मारली. बांगलादेश धावांचा पाठलाग करत असताना सातव्या षटकात पावसाला सुरुवात झाली आणि सामना थांबविण्यात आला. अर्ध्या तासानंतर डकवर्थ लुईस नियमानुसार १६ षटकांमध्ये १५१ धावांचे सुधारित लक्ष्य बांगलादेशला देण्यात आले, मात्र बांगलादेशला १४५ धावांपर्यंत मजल मारता आली आणि त्यांनी हा सामना गमावला. भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीपने चार षटकांत ३८ धावांच्या मोदबल्यात दोन महत्त्वाच्या गड्यांना बाद केले.



जसप्रीत बुमराह भारतीय संघात असताना तो शेवटचे षटक टाकतो. सामान्यपणे शमी हा पेनल्टीमेट म्हणजेच १९वे षटक टाकतो, तर अर्शदीप हा अगदी आशिया चषकापासून ते या विश्वचषकामध्येही २०वे षटक टाकणाऱ्या गोलंदाजांपैकी एक असल्याने त्याची निवड करण्यात आल्याचे रोहितने म्हटले.

### पावसानंतर खेळात खूप फरक

पावसाच्या आधी आणि नंतर भारतीय संघांच्या खेळामध्ये खूप फरक दिसून आल्याचे अप्रत्यक्षपणे कर्णधार रोहित शर्मानेही मान्य केले. मी एकाच वेळी शांत आणि थोडा बेचैन होतो. एक संघ म्हणून आम्ही आमच्या नियोजित प्लॅनप्रमाणे मैदानात खेळणे आमच्यासाठी हे फार महत्त्वाचे होते. त्यांचा एकही गडी बाद झाला नव्हता. त्यांच्याकडे १० विकेट्स शिल्लक असल्याने सामन्याचा निकाल कोणत्याही बाजूने लागणे शक्य होते, मात्र पावसाच्या ब्रेकनंतर आम्ही चांगली कामगिरी केली, अस रोहित म्हणाला.

# राज्यस्तरीय थांग-ता स्पर्धेत रायगडातील खेळाडूंचे सुयश

**रोहे : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय थांग-ता स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. कोल्हापुरातील आदर्श विद्यानिकेतन येथे ऑल महाराष्ट्र थांग-ता असोसिएशनने ही स्पर्धा आयोजिली होती.




या स्पर्धेत रायगड थांग-ता असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली खेळण्यासाठी गेलेल्या खेळाडूंनी पदके जिंकली. वीर मुंबरकर, रितुल म्हात्रे, स्वरा पवार, प्रद्युम म्हात्रे, रोहित भोसले यांनी सुवर्ण, विराज मोकल, प्रेम म्हात्रे, जान्हवी वनगे, अभिषेक वर्तळे यांनी रौप्य, ओम पाटील, पुष्कर म्हात्रे, युवराज भगत, दुर्वा पेरवी, दिशा गुरव, गायत्री कारखानीस, यर्दाथी पाटील, स्वरूपा चौधरी, निल पाटील, आयुष पाटील, खुशहाल सिंग, राजवीर देशमुख, तेजश्री ऐवळे, परिणीता मोकल, रिया भानुस्कर, रविना म्हात्रे यांनी कांस्य अशी एकूण पाच सुवर्ण, चार रौप्य व १६ कांस्यपदके सर्व खेळाडूंनी मिळून पटकाविली.

या सर्व खेळाडूंचे प्रशिक्षक म्हणून प्रशांत गांगर्डे, अदित्य तेरेदेसाई, विनायक पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धा ऑल महाराष्ट्र थांग-ताचे सचिव महावीर धुळधर, कोल्हापूर थांग-ता असोसिएशनचे सचिव अविनाश पाटील व आदर्श विद्यानिकेतन या संस्थेच्या अध्यक्षतेखाली झाली.


रायगडच्या सर्व यशस्वी खेळाडूंचे रायगड थांग-ताचे सचिव मंदार पनवेलकर यांनी अभिनंदन केले. यातील सुवर्णपदक जिंकलेल्या खेळाडूंची तामिळनाडूतील कन्याकुमारी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या थांग-ता संघात निवड करण्यात आली आहे.

# मुलींची क्रिकेट निवड चाचणी भेंडखळला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १५ वर्षांखालील मुलींची क्रिकेट निवड चाचणी ५ व ६ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. उरण तालुक्यातील भेंडखळ क्रिकेट अकादमी मैदानात ही चाचणी होणार आहे. या चाचणीतून रायगडचा मुलींचा संघ निवडण्यात येणार, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

१ सप्टेंबर २००७ रोजी अथवा त्यानंतर व ३१ ऑगस्ट २००९पूर्वी जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील मुली या निवड चाचणीत पात्र ठरतील. पांढरा क्रिकेट गणवेश घालून मुलींनी मौदानावर सकाळी ८ वाजता मुलींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. यासाठी मुलींनी आपली नोंदणी करणे गरजचे आहे. त्या संदर्भातील फॉर्म जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या फेसबूक पेजवर (@rdca२०१७) उपलब्ध आहे. नोंदणी केलेल्या मुलींनाच चाचणीत प्रवेश देण्यात येणार आहे.



अधिक माहितीसाठी संदीप पाटील (८३६९७८९३८५), विनय पाटील (९०८२५८२९०५), मनीषा अडबल (९९७००६२१४८), प्रीतम कैया (९३२२२४३५३४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी केले आहे.

# हीच आमची शोकांतिका!

## भारताविरुद्धच्या पराभवानंतर शाकीबने व्यक्त केल्या भावना

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशला भारताविरुद्धच्या सामन्यात पाच धावांनी पराभव स्वीकारावा लागला. बांगलादेशचा कर्णधार शाकीब अल हसनला या पराभवाचा धक्का बसला आहे. आमचा संघ भारताविरुद्धचा सामना प्रत्येक वेळी जिंकण्याच्या जवळ येतो, पण आम्ही अंतिम ध्येय गाठू शकलो नाही. हीच आमची शोकांतिका राहिली आहे, असे शाकिबने म्हटले आहे.



सामना संपल्यानंतर शकीब म्हणाला, हा एक उत्तम सामना झाला, ज्याचा दोन्ही संघांनी आनंद घेतला. शेवटी कोणतरी जिंकणार, कोणीतरी हरणार. सामना रंजक झाला आणि आम्ही आमच्याकडून पूर्ण क्षमतेने लढलो यातच आम्हाला समाधान आहे. लिटन दास हा आमचा सर्वोत्तम फलंदाज आहे. पॉवरप्लेमध्ये त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी केली, त्यामुळे आम्ही लक्ष्याचा पाठलाग करू शकतो, असा आत्मविश्वास त्याने आम्हाला दिला.

शाकिब पुढे म्हणाला, जर तुम्ही भारताचे वरच्या फळीतील प्रमुख चार फलंदाज पहिले तर ते खूप धोकादायक आहेत. त्या चार खेळाडूंना लवकर बाद करण्याची आमची योजना होती आणि म्हणून आम्ही तस्किन अहमदला सुरुवातीस चारही षटके सलग टाकायला दिली. दुर्दैवाने तस्किनला विकेट घेता आली नाही, पण त्याने कसून गोलंदाजी केली. या विश्वचषकात आम्हाला अजून एक सामना खेळायचा आहे आणि आम्ही त्यावर लक्ष केंद्रित करू इच्छितो.

# टीम इंडियात निवड झाल्याने कुलदीप सेन भावूक



### संजू सॅमसनला दिले श्रेय

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात वनडे आणि टी-२० मालिका खेळली जाणार आहे. न्यूझीलंड दौऱ्यासाठी जाहीर झालेल्या वनडे संघात युवा वेगवान गोलंदाज कुलदीप सेनला संधी मिळाली आहे. त्यावर कुलदीपने भावनिक प्रतिक्रिया दिली आहे.


न्यूझीलंड मालिकेसाठी वनडे मालिकेत निवड झालेल्या कुलदीप सेनने आपल्या कारकिर्दीचे श्रेय संजू सॅमसनला दिले आहे. त्याने आरआर वेबसाइटद्वारे सांगितले की, मी केरळविरुद्ध सय्यद मुश्ताक अली खेळत होतो. मी यॉर्कर, लांबीचे चेंडू टाकत असताना संजू सॅमसनने माझ्याकडे पाहिले. मग त्याने राजस्थान रॉयल्सच्या चाचणीबद्दल सांगितले. त्याचबरोबर त्याने मला संपर्क करण्यासाठी एक नंबर पाठवला होता.

'रेवाचनल एक्स्प्रेस' या नावाने प्रसिद्ध असलेल्या कुलदीप सेनचा राजस्थान रॉयल्सने गेल्या वर्षी उच्च बोली लावून संघात समावेश केला होता. गेल्या आयपीएलमध्ये त्याने चमकदार कामगिरी करताना १४०-१४५ किमी वेगाने गोलंदाजी केली. या कामगिरीच्या जोरावर कुलदीपची न्यूझीलंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या एकदिवसीय मालिकेसाठी निवड झाली आहे.

# पंजाब किंग्जच्या कर्णधारपदी शिखर धवन

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या टी-२० विश्वचषक सुरू आहे, पण अशातच आता आयपीएलच्या सोळाव्या हंगामाचे वारे वाहू लागले असून पंजाब किंग्जने इंडियन प्रीमियर लीग २०२३ हंगामासाठी मयंक अग्रवालच्या जागी शिखर धवनची नवीन कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. अलिकडच्या काळात एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व करणाऱ्या धवनला पंजाब किंग्जचे नवीन मुख्य प्रशिक्षक ट्रेव्हर बेलिस यांची साथ मिळाली आहे.



फेब्रुवारी २०२२मध्ये आयपीएल मेगा-लिलावापूर्वी मयंक अग्रवाल आणि अर्शदीप सिंग यांना पंजाब किंग्जने कायम ठेवले होते तसेच आयपीएल हंगाम सुरू होण्यापूर्वी मयंकची केएल राहुलच्या जागी संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. गेल्या वर्षी झालेल्या मेगा लिलावात पंजाबने शिखर धवनला ८.२५ कोटी रुपयांना खरेदी केले होते.

आयपीएलच्या गेल्या काही हंगामांत धवन सातत्याने चांगली कामगिरी करीत आहे. त्याने २०२०च्या मोसमात दिल्ली कॅपिटल्ससाठी ६१८ धावा केल्या होत्या, तर पंजाब किंग्ससाठी त्याच्या पदार्पणाच्या हंगामात १४ सामन्यात ४६० धावा केल्या. भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्यासह चाहते आणि क्रिकेट तज्ज्ञांनी हंगाम संपल्यानंतर मयंकला कर्णधारपदावरून हटवण्याची मागणी केली होती. त्याचप्रमाणे आता धवनची कर्णधारपदी नियुक्ती करावी, असे काहींचे मत होते. त्यानुसार धवनकडे पंजाबची धुरा सोपविण्यात आली आहे.

# विराट कोहली एक योद्धा -जयवर्धने

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज विराट कोहलीच्या बॅटमधून टी-२० विश्वचषक स्पर्धेत खूप धावा होत आहेत. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात नाबाद ६४ धावा करून विराटने श्रीलंकेचा माजी फलंदाज महेला जयवर्धनेचा विक्रम मोडीत काढला. यानंतर जयवर्धनेने विराटचे अभिनंदन करीत त्याचे वर्णन योद्धा असे केले आहे.

विराटने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात १६वी धाव पूर्ण केल्यावर त्याने २०१४पर्यंत केलेल्या टी-२० विश्वचषकात महेला जयवर्धनेच्या सर्वाधिक धावांचा (१०१६) विक्रम मागे टाकला. विराटच्या या विक्रमी खेळीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) एक व्हिडिओ शेअर केला, ज्यामध्ये महेला जयवर्धने भारताच्या स्टार फलंदाजाचे नवीन विक्रम रचल्याबद्दल अभिनंदन करीत आहे. या इन्टाग्राम व्हिडीओत श्रीलंकेचा दिग्गज खेळाडू महेला जयवर्धने म्हणाला, विक्रम मोडण्यासाठी बनवले जातात. कोणीतरी माझा विक्रम मोडणार होता आणि तो तू 'विराट' विक्रम मोडला आहेस. अभिनंदन मित्रा. तू नेहमीच योद्धा होतास आणि पुढेही राहशील. फॉर्म तात्पुरता आहे, परंतु फलंदाजीतील क्लास हा मात्र कायम असतो. तू माझा खूप जिवलग मित्र आहेस.

# राहुलने सांगितला विराटचा कानमंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात फॉर्ममध्ये परतणाऱ्या केएल राहुलने अर्धशतक ठोकून टीम इंडियाच्या विजयाचा पाया रचला. कर्णधार रोहित शर्मा लवकर बाद झाल्यानंतर राहुलने विराट कोहलीच्या साथीने संघाच्या मोठ्या धावसंख्येकडे वाटचाल केली. सामना संपल्यानंतर राहुलने नेटमध्ये विराट कोहलीसोबत काय चर्चा केली ते सांगितले.

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यापूर्वी विराट कोहली आणि केएल राहुलचा नेटमधील संभाषणाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये विराट त्याला ऑस्ट्रेलियात खेळण्यासाठी काही टिप्स देत असल्याचे दिसत होता.

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यानंतर पत्रकार परिषदेत केएल राहुलला विचारण्यात आले की, नेटमध्ये सराव करताना विराट कोहलीसोबत काय बोलणे झाले होते. यावर बोलताना केएल म्हणाला, विराट मला आस्ट्रेलियातील बॅटींग कंडिशनबद्धल सांगत होता. तो मला सांगत होता की, यापूर्वी ऑस्ट्रेलियात टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, पण या वेळी परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. या वेळी येथे खेळणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक आहे.

# भविष्यातील खूप मोठा फलंदाज उदयास येतोय!

## रॉस टेलरकडून सूर्यकुमारचे कौतुक



**ऑकलंड : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा माजी क्रिकेटपटू रॉस टेलरही सूर्यकुमार यादवच्या फलंदाजीने प्रभावित झाला आहे. आयसीसी क्रमवारीतील नवीन नंबर १ टी-२० फलंदाजाचे भविष्य आणखी चांगले असू शकते. त्याने क्रिकेटच्या सर्व प्रकारात खेळले पाहिजे. भविष्यातील खूप मोठा फलंदाज उदयास येत आहे, असे म्हणत त्याने टेलरने सूर्याला शुभेच्छा दिल्या.

सूर्याविषयी बोलताना रॉस टेलर म्हणाला की, संघात मधल्या फळीत क्रमांक चार-पाच हे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फलंदाजीसाठी सर्वांत कठीण ठिकाण आहे. जेव्हा तुम्ही केएल राहुल, रोहित शर्मा आणि विराट कोहली, काही महान फलंदाजांच्या मागे फलंदाजी करीत असाल तेव्हा अव्वल क्रमांकावर असणे ही सोपी गोष्ट नाही. अशी कामगिरी करणे क्वचितच एखाद्या महान खेळाडूला जमते. सर्वांच्याच आवाक्यातील ही गोष्ट नाही. चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करून एवढे मोठे यश मिळवणे माझ्या दृष्टीने हे एक आश्चर्य आहे असून त्याने सत्यात उतरवले आहे.

### सर्व बाजूंना फटके मारण्याची क्षमता

*सूर्याच्या फलंदाजी शैलीबद्दल टेलर म्हणाला की, तो कसा फलंदाजी करतो हे मला माहीत नाही, पण तो त्या वेळेस असणारी परिस्थितीशी जुळवून घेत फलंदाजी करतो. नुसते चौकार-षटकारच नाही, तर तो एकेरी-दुहेरी आणि मोठे मैदान असेल, तर तिहेरी धावादेखील चांगल्या काढतो. यामुळे स्ट्राइक रोटेट होण्यास मदत होते आणि गोलंदाजावर दबाव वाढत जातो. त्याच्यात मैदानाच्या सर्व बाजूंना फटके मारण्याची क्षमता असून म्हणूनच त्याला सगळेजण 'मिस्टर ३६०' असे म्हणतात. असे फटके फक्त एकच खेळाडू मारू शकतो ज्याच्यात खूप आत्मविश्वास आहे. त्याला गोलंदाज काय विचार करीत आहे हे आधीच कळते.*

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com